।। सबका मालिक आत्मा ।।



आत्मा (SOUL)

।। हृदयामध्ये आत्म्यावरती प्रेम करण्याची कला म्हणजे ध्यान ।।

आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

।। ॐ गुरुदेव ।।

आत्मा मालिक

ऑगस्ट - २०२६



।। अमृतवाणी ।।

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व-रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

।। आत्मा मालिक ।।

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २५ वे अंक ८ वा ऑगस्ट २०२६ • RNI-MAHMAR/2001/4853

संस्थापक संपादक

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

संपादक

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

संपादकीय सल्लागार

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

मार्गदर्शक

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

आत्मा मालिक ध्यानपीठ

दीपक टिळेकर, मो. ८३८००३९३०५
सुखदेव मोरे, मो. ७०५८०५९६६१

प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

धर्मशाळा (निवास व्यवस्था)

विलास गायकवाड,
मो. ९९२२१७४२११

संपादकीय - प्रेमभक्ती - संत परमानंद महाराज ४

देवकृत सोपी पायवाट - डॉ. विजय बाणकर ७

माऊलींचे अमृतानुभव दर्शन २ : एकरुपता - नामदेव सदावर्ते ११

गौळणी गायन : एक चिंतन - बंडोपंत कुलकर्णी १५

ऐसी कर्मगती ऐसा ध्यानी ज्ञानिया (भाग ७) - डॉ. सुनील शिंदे १९


आत्मा मालिक गुरुपौर्णिमा महोत्सव-२०२६ - बी. के. गायकवाड २२

आत्मा : आकार, मौन और वाणी के पीछे क़ा सत्य - नरेश यादव २८

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



संपादकीय

प्रेमभक्ती

भारतीय अध्यात्माच्या विशाल परंपरेत अनेक योगमार्ग उदयास आले. ज्ञानयोगाने विवेकाचा दीप प्रज्वलित केला, कर्मयोगाने कर्तव्याला ईश्वरार्पणाची दिशा दिली, राजयोगाने मनावर विजय मिळविण्याचे तंत्र सांगितले; परंतु या सर्व मार्गांमध्ये एक असा मार्ग आहे, ज्याने विद्वान आणि सामान्य, राजा आणि रंक, स्त्री आणि पुरुष, ज्ञानी आणि अज्ञानी यांच्यातील सर्व भेद विरघळवून टाकले. तो मार्ग म्हणजे प्रेमभक्तीचा मार्ग.

-संत परमानंद महाराज

संतांनी ईश्वराला तर्काने नव्हे, तर प्रेमाने जिंकले. त्यांनी वेदांचा अर्थ पोथ्यांमध्ये शोधला नाही; तर प्रत्येक सजीवाच्या हृदयात शोधला. म्हणूनच संतपरंपरा ही केवळ धार्मिक चळवळ नाही, तर मानवी मनाच्या उत्क्रांतीचा इतिहास आहे. या परंपरेत भक्ती म्हणजे भीती नव्हे, भक्ती म्हणजे मागणे नव्हे, भक्ती म्हणजे कर्मकांड नव्हे; तर भक्ती म्हणजे स्वतःला पूर्णपणे परमेश्वराच्या प्रेमात विलीन करून टाकणे. प्रेम हा शब्द उच्चारायला जितका सोपा आहे, तितका तो जगायला कठीण आहे. कारण प्रेमामध्ये 'मी' टिकत नाही. प्रेम म्हणजे स्वतःचा विसर आणि दुसऱ्याचा स्वीकार. संतांनी हीच प्रेमाची व्याख्या ईश्वराशी जोडली. त्यांनी विठ्ठलाला आई, बाप, मित्र, सखा म्हणून अनुभवले. देवाशी त्यांनी अंतर ठेवले नाही; उलट त्याला आपल्या श्वासात सामावून घेतले.

माऊली ज्ञानेश्वरांनी विश्वातील प्रत्येक कणात चैतन्य अनुभवले. त्यांच्यासाठी भक्ती म्हणजे जगाचा त्याग नव्हता; तर जगात परमात्म्याचे दर्शन घेण्याची दृष्टी होती. त्यांनी पसायदानात मागितलेले विश्वकल्याण हे त्यांच्या प्रेमभक्तीचे सर्वोच्च शिखर आहे. त्यांनी स्वतःसाठी मोक्ष मागितला नाही; तर संपूर्ण सृष्टीच्या मंगलाची प्रार्थना केली. प्रेम जेव्हा केवळ स्वतःपुरते राहत नाही आणि विश्वाला कवेत घेते, तेव्हा त्याचे रूप भक्तीत परिवर्तित होते. संत नामदेवांची भक्ती तर बालकाच्या निरागस प्रेमासारखी होती. विठ्ठलाशी ते रुसले, हसले, बोलले, भांडले; पण कधी दूर गेले नाहीत. त्यांच्या भक्तीत औपचारिकता नव्हती, तर जिव्हाळा होता. जिथे नात्यात कृत्रिमता नसते, तिथे देव आपोआप उतरतो. म्हणूनच संत म्हणतात-ईश्वराला मोठमोठ्या यज्ञांची आवश्यकता नसते; त्याला निष्कपट हृदय पुरेसे असते.

संत एकनाथांनी प्रेमभक्तीला समतेचा आधार दिला. त्यांनी जातीभेदाच्या भिंती मोडल्या आणि प्रत्येक माणसात ईश्वराचे दर्शन घेतले. त्यांच्यासाठी प्रेम म्हणजे केवळ देवावरचे प्रेम नव्हते; तर प्रत्येक जीवावर केलेले प्रेम हीच खरी ईश्वरभक्ती होती. कारण जो माणसावर प्रेम करू शकत नाही, तो देवावर प्रेम करतो असे म्हणणे ही आत्मवंचना आहे. संत तुकाराम महाराजांनी प्रेमभक्तीला मानवी वेदनेची भाषा दिली. त्यांच्या अभंगांत कधी आर्त हाक आहे, कधी आनंदाचा जल्लोष आहे, कधी आत्मपरीक्षण

आहे, तर कधी विठ्ठलाशी केलेला लडिवाळ संवाद आहे. त्यांची भक्ती ही तत्त्वज्ञानाच्या कठीण भाषेत बोलत नाही.

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात-

जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले।
तोचि साधू ओळखावा, देव तेथेंचि जाणावा।।

देव शोधण्यासाठी तीर्थक्षेत्रांची गरज नाही; दुःखी माणसाच्या डोळ्यातले अश्रू पुसले की देव स्वतः भेटतो. प्रेम जेव्हा करुणेत रूपांतरित होते, तेव्हा भक्ती जन्म घेते.

संत चोखामेळा यांच्या आयुष्यातील वेदना समाजाने दिल्या; पण त्यांच्या अंतःकरणात कटुता नव्हती. त्यांनी विठ्ठलावर राग धरला नाही. उलट प्रत्येक अपमान ईश्वराच्या चरणी अर्पण केला. हीच प्रेमभक्तीची परिपक्व अवस्था आहे. बाह्य परिस्थिती दुःखद असली, तरी अंतर्मन प्रेमाने उजळलेले असते. संत जनाबाई विठ्ठलाला घरकामात मदत करणारा सखा मानतात. त्यांच्या भक्तीत देव हा दूरचा, भयप्रद राजा नाही. तो दैनंदिन जीवनात सहभागी होणारा कुटुंबातील सदस्य आहे. प्रेमाचे हे सहज रूप भक्तीला अधिक मानवी बनवते.

मुक्ती म्हणजे नेमके काय? अनेकांनी तिची वेगवेगळी व्याख्या केली. काहींनी जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटका म्हणजे मुक्ती असे म्हटले. काहींनी ब्रह्माशी एकरूप होणे म्हणजे मुक्ती असे सांगितले. परंतु संतांनी मुक्तीची अत्यंत सुंदर व्याख्या केली. त्यांनी सांगितले-ज्या क्षणी मनातून अहंकार निघून जातो, त्या क्षणी मुक्ती प्राप्त होते.

प्रेमभक्तीचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे ती 'मी'पणाचा नाश करते. जोपर्यंत 'मी करतो', 'मी जाणतो', 'मी श्रेष्ठ' हा अभिमान आहे, तोपर्यंत ईश्वर दूर राहतो. प्रेमात मात्र 'मी' विरघळतो. नदी समुद्रात मिसळते तेव्हा तिचे नाव राहत नाही; पण तिचे अस्तित्व अधिक व्यापक होते. भक्ताचेही तसेच होते. तो स्वतःला हरवतो आणि परमेश्वरात सापडतो. संतांनी मोक्षाची आकांक्षा देखील अनेकदा बाजूला ठेवली. कारण त्यांच्यासाठी देवाचे स्मरण हेच अंतिम फळ होते. तुकाराम महाराज म्हणतात की, मला मुक्ती नको, मला तुझ्या नामाचा सहवास हवा. ही किती विलक्षण भावना आहे! जेथे भक्ताला देवापेक्षा देवाचे प्रेम अधिक प्रिय वाटते, तेथे मुक्ती आपोआप येते.

प्रेमभक्तीची खरी कसोटी सुखात नसते; ती दुःखात असते. संकटे आली, अपमान झाला, अपयश आले, तरी देवावरील विश्वास डळमळीत झाला नाही, तर समजावे की भक्ती परिपक्व झाली आहे. कारण प्रेम हे व्यवहार नसते. ते देवाशी केलेले सौदेबाजीचे नाते नसते. प्रेमात अट नसते, अपेक्षा नसते; फक्त समर्पण असते. संतांच्या प्रेमभक्तीत समता, करुणा, क्षमा आणि सेवाभाव यांना अत्यंत महत्त्व आहे. जो देवावर प्रेम करतो, पण माणसाचा तिरस्कार करतो, त्याची भक्ती अपुरी आहे. कारण प्रत्येक जीवात तोच परमात्मा आहे. विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म हा संतांचा विचार आजही तितकाच समर्पक आहे. भक्ती मनुष्याला नम्र बनवते. ज्ञानामुळे कधी अहंकार निर्माण होऊ शकतो; संपत्तीमुळे गर्व निर्माण होऊ शकतो; सत्तेमुळे दर्प निर्माण होऊ शकतो; परंतु खरी भक्ती माणसाला अधिक विनम्र

करते. फळांनी भरलेला वृक्ष जसा खाली झुकतो, तसाच प्रेमाने भरलेला भक्तही अधिक नम्र होतो. मुक्ती ही मृत्यूनंतर मिळणारी गोष्ट नाही. ती जिवंतपणी अनुभवता येते. मनातील द्वेष संपला, मत्सर विरघळला, लोभ कमी झाला, अपेक्षांचा भार हलका झाला आणि प्रत्येक जीवात परमेश्वर दिसू लागला, तर त्याच क्षणी मुक्तीची पहाट उगवते. संतांनी यालाच 'जीवनमुक्ती' म्हटले आहे. प्रेमभक्तीचा मार्ग कठीण नाही; पण तो प्रामाणिक आहे. त्यासाठी मोठे शास्त्रज्ञान लागत नाही, विद्वत्ता लागत नाही, कठोर तपश्चर्या लागत नाही. लागते ते फक्त निरागस हृदय. बालक जसे आईवर पूर्ण विश्वास ठेवते, तसाच विश्वास भक्ताने परमेश्वरावर ठेवायचा असतो. त्या विश्वासातूनच भक्ती जन्म घेते, भक्तीतून समर्पण येते, समर्पणातून आत्मशुद्धी होते आणि आत्मशुद्धीतून मुक्ती प्राप्त होते.

संतांची प्रेमभक्ती माणसाला केवळ देवाजवळ नेत नाही; ती माणसाला माणसाजवळ आणते. प्रेमभक्ती ही केवळ उपासनेची पद्धत नाही; ती जगण्याची संस्कृती आहे. ती अंतःकरणात करुणा निर्माण करते, वाणीला माधुर्य देते, कृतीला पावित्र्य देते आणि आत्म्याला स्वातंत्र्य देते. ज्या हृदयात प्रेमाचा अखंड झरा वाहतो, तेथे देवाला वेगळे आमंत्रण द्यावे लागत नाही. तो तेथे आधीपासूनच वसलेला असतो.

म्हणूनच संतांचा संदेश आजही काळाच्या पलीकडे उभा आहे-ज्ञानाने देव समजतो, कर्माने देवाची सेवा होते; परंतु प्रेमभक्तीने देव स्वतः भक्ताच्या हृदयात येऊन निवास करतो. आणि ज्या हृदयात परमेश्वराचा निवास झाला, त्या हृदयाला पुन्हा कोणत्याही बंधनाची भीती राहत नाही. हाच संतांनी अनुभवलेला मुक्तीचा अमृतमार्ग आहे.


|| आत्मा मालिक ||

- संत परमानंद महाराज,

संपादक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



देवकृत सोपी पायवाट

देव आपल्याजवळ आहे; तथापि, लोक त्याबाबत चुकत असतात आणि देवाप्रत जाण्यासाठीची देहनगरातून असलेली देवकृत वाट सोपी आहे, असे श्रीतुकाराम व श्रीज्ञानदेव हे दोन्ही संत म्हणतात.१ म्हणून देव व देवाप्रत घेऊन जाणाऱ्या पायवाटेबाबत त्यांचा व ईंर संतांचा अभिप्राय समजून घेऊयात.

- डॉ. विजय बाणकर

ज्या वाटेने चालत जाता येते ती पायवाट होय. पायवाट या शब्दाचा वाच्यांश म्हणजे शब्दशः अर्थ होय; तर, त्या वाटेने जाताना अष्ट सात्त्विक भाव निर्माण होतात व चारी मुक्ती लाभल्याचा२ म्हणजे देवरूप झाल्याचा अनुभव येतो, हा त्याचा लक्ष्यांश होय. यावरून, पायवाट हा भक्तिमार्गाविषयीचे रहस्य जाणून घेण्यासाठीची उत्सुकता निर्माण करणारा एक शब्द आहे, असे लक्षात येते.

ते रहस्य श्रीकबिरांच्या दोह्यांच्या पुढील भावानुवादातून सूचित होते -

चालून थकले पाय राहिले नगर नऊ कोस।
मध्येच तळ पडला तों म्हणू कुणाचा दोष।।
चालशील तू कुठवर ते ठाऊक नसता नांव।
गेले युगही जरी होते ते पाव कोसचि गाव।।३

यांत मूळ दोह्यांमधले बहुतेक शब्द आहेत. ते समजून घेताना देवाप्रत नेणाऱ्या पायवाटेबाबत आपल्याला पुढील गोष्टी माहीत होतात -

अध्यात्म शास्त्रानुसार मानवी देहाचे दोन भाग पडतात. पायांपासून भुवयांपर्यंतचा भाग म्हणजे पिंड व भुवयांवरील मस्तकाचा भाग म्हणजे ब्रह्मांड होय. पिंडात जीव राहतो व ब्रह्मांडात देव राहतो.४ श्रीकबिरांनी नगर या शब्दाने ब्रह्मांडाचा निर्देश केला आहे. पिंडाला दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, मुख, लिंग व गुद अशी नऊ द्वारे असतात. या नऊ द्वारांनी जीव सुख दुःखे उपभोगत असतो. तो जणू नऊ द्वारे असलेल्या गावामध्येच रमलेला असतो. या अर्थाने, देव राहतो त्या नगरापासून तो जणू नऊ कोस अंतरावरील गावामध्ये राहतो. देव डोळ्यादी ज्ञानेंद्रियांना दिसत नाही. याही अर्थाने तो राहतो ते नगर जीव राहतो त्या नऊ द्वारेरूपी गावापासून (नऊ कोस) दूर असतो.

श्वासोच्छ्वास असेपर्यंतच शारीरिक, वाचिक व मानसिक हालचाली चालू राहतात. अविरतपणे श्वासोच्छ्वास करून जीव थकून जातो व एक दिवस देह सोडून जातो; पण, पिंड व ब्रह्मांड यांच्या सीमेवरील भ्रूमध्याजवळील दशवे द्वारातून वर ब्रह्मांडात असलेल्या देवाप्रत तो जात नाही.

संत श्रीकबिरांनी मूळ दोह्यात 'बीच में ही डेरा परा' असे म्हटले आहे. म्हणजे, 'मध्येच तळ पडला' होय. 'मध्येच तळ पडणे' म्हणजे 'देवाची भेट होण्यापूर्वीच मरण येणे'. काही जण साधना करीत असतात; पण मृत्युमुळे ती अपुरी राहते. याही गोष्टीला श्रीकबीर 'मध्येच तळ पडणे' म्हणतात. अशा प्रकारे, 'चालून थकले पाय' याचा अर्थ, मृत्युची वेळ येऊन ठेपली म्हणून श्वास घेण्याची शक्ती संपली,

हा होय.

देवाची भेट न होता असे लाखो वेळा घडते. पण, नऊ द्वारे असलेल्या पिंडरूपी नगरात हिंडता हिंडता जन्म जातो तरी देव राहतो त्या ब्रह्मांडरूपी मंदिरात ज्या एका द्वारातूनच प्रवेश करावयाचा असतो ते द्वार जीव जाणून घेत नाही,५ असे श्रीज्ञानदेवांनी देखील म्हटले आहे. अर्थात, 'देवाचे द्वार' या त्यांच्या 'हरिपाठातील' शब्दांचा लक्ष्यांश म्हणजे भ्रूमध्याजवळील 'दशवेद्वार' हा होय.

नयनाचे शेजारी दशवेद्वार बापा।

एक मार्ग सोपा बोलतसे।।६

अशा अगदी सुस्पष्ट शब्दांत त्यांनी त्या द्वाराची महतीही उल्लेखिली आहे.

तर, श्रीज्ञानदेव म्हणतात की देवाप्रत जाण्यासाठीचा सोपा मार्ग आपल्या देहातच आहे, श्रीतुकाराम व श्रीनामदेव७ म्हणतात की भक्ती करता यावी म्हणून तुमच्यासाठीचा देव तुमच्याजवळच आहे, श्रीविवेकानंद सांगतात की रानावनांत, गिरिकंदरात, तीर्थोतीर्थीं, देवळा-रावळात आहे वा स्वर्गातील सिंहासनावर बसलेला आहे अशी ज्या देवाविषयी आपण कल्पना करीत असतो तो आपला आत्माच असल्याचा अनुभव येतो८ आणि श्रीकबीरम्हणतात की देव पाव कोसावरच आहे. हे पाव कोस म्हणजे पिंडातील नाभिकमलनिवासी जीव व ब्रह्मांडातील सहस्रदलकमल निवासी देव यांच्यामधील अंतर होय. 'आत्मप्रभा' नामक ग्रंथातील पुढील ओव्यांतही 'नाभिकमळ ते सहस्र दल कमळ' ही देवकृत पायवाट असल्याचे अनुस्यूत आहे -

देह नगरातूनि आहे वाट। चढोनि षड्चक्रांचा घाट।

सहस्रदळ समाधी अघाट। भोगिती योगी।।

सहस्र दळाचे शेवटीं। दिसे मूर्ति चिन्मय ।।९

ही आपल्या देहात असलेली पायवाट चढत चिन्मय देवाप्रत कसे जावयाचे ते श्रीसद्गुरू शिकवितात. त्याबाबत श्रीकबीर म्हणतात,

'नामजप जो सहज देहीं दाविती गुरुराव।

श्वासोच्छ्वासीं नाम स्मरिता भेटे देवराव।।'१०

आणि, सर्व प्राण्यांच्या देहात चालू असलेला सोऽहं हा जप जाणून घेऊन जीव सर्व बंधनांपासून मुक्त होतो, असे श्रीशंकराचार्य म्हणतात -

सर्वत्र प्राणिनां देहेजपो भवति सर्वदा।

हंस सोऽहं इति ज्ञात्वा सर्वबंधैः प्रमुच्यते।।११

श्रीकबीर अजपास गुप्त आदिनाम१२ म्हणतात. हे आदिनाम जपत राहणे म्हणजे श्वासोच्छ्वास रूपी पायवाटेने जात राहणे होय. आपल्या श्वासोच्छ्वासात अहोरात्र चालू असलेल्या अजपाकडे लक्ष देणे हे भक्तिकर्म होय. ते अभंग साक्षीभावाने करता येणे म्हणजे निजध्यान होय. उपवास, तीर्थाटने, शास्त्राभ्यास तसेच योगाभ्यास वगैरे गोष्टींचा 'गलबला' केवळ हेच 'ध्यान' प्राप्त व्हावे म्हणून होत असतो. म्हणून, देवाने जन्माबरोबरच दिलेला म्हणजे 'सहज' असलेला अजपा जप सोडून दुसरे काही करणे रूपी 'सायासीं पडोच नये' असे श्रीरामदास स्वामींनी 'दासबोधात' सविस्तर पटवून दिले आहे.[१३]

मोक्ष मिळवून देणाऱ्या साधनांमध्ये भक्तीच सर्वश्रेष्ठ आहे, असे सुस्पष्ट 'मार्ग'दर्शन

श्रीशंकराचार्य यांनी पुढील श्लोकातून केले आहे -

मोक्षकारणसामग्र्यां भक्तिरेवगरीयसी।

स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरित्यभिधीयते।।[१४]

या श्लोकात म्हटल्याप्रमाणे 'भक्ती म्हणजे स्वस्वरूपानुसंधान' होय. 'मी आत्मा आहे' या अर्थाचे स्मरण म्हणून 'सोऽहं'-जप करणे म्हणजे स्वस्वरूपानुसंधान वा आत्मानुसंधान करणे होय. 'मी देह आहे' या भावामुळे जीव देवापासून विभक्त झालेला असतो. अविभक्त भक्त होता यावे म्हणून अजपा जपत राहणे किंवा स्वरूपानुसंधान करणे म्हणजे' तो (देव) मी आहे' हा सद्भाव आळवत राहणे होय. हा सद्भाव आळवत राहिल्याने 'मी देह आहे' हा भाव लय पावतो. देहभाव लय पावला की संसारास कारणीभूत असणारी अविद्या किंवा माया लय पावते. माया म्हणजे स्वरूपविषयक अज्ञान होय. ते लय पावले की 'मी देव आहे', असे ज्ञान होते. अशा प्रकारे सज्ञान होऊन अखंड सोऽहं-ध्यान करीत राहिले की संसाररूपी माया पूर्णतः लय पावते. थोडक्यात, अखंड सोऽहं-ध्यान लागणे वा करणे म्हणजे 'देवाला आवडणारी थोर भक्ती'[१५]करणे होय.

ही भक्ती करताना, श्रीतुकाराम म्हणतात त्याप्रमाणे, फक्त मनरूपी मोगरा, मनरूपी शेवंती किंवा मनरूपी तुळस देवाला अर्पण केली की मुक्ती मिळते.[१६] इतर पूजा साहित्य लागत नाही. ते सांगतात त्याप्रमाणे 'ठायींच बैसोनी एकचित्ताने देवाला आळवीत' राहिल्याने[१७] क्षेत्रसंन्यास घडतो, मन एकाग्र करताना श्वासावर नियंत्रण येते व प्राणायाम घडतो, ज्ञानेंद्रियांचा बाह्यजगाशी संबंध संपतो म्हणजे प्रत्याहार घडतो, देव जवळ असल्याची भावना जोपासत राहिल्याने उप-वास व उपासनाही घडते, दहा इंद्रिये व अकरावे मन एकत्र आणून देवाचे स्मरण होत असल्याने आध्यात्मिक एकादशी केल्याचे पुण्य लाभते, 'मी आत्मा आहे' या सद्भावामुळे 'स्वरूपीं राहणे' रूपसर्वोत्तम स्वधर्माचरण घडते.[१८]भगवान श्रीकृष्ण म्हणतात त्याप्रमाणे आत्मानुसंधानाने मनातील संकल्प निःशेषपणे जळतात[१९] म्हणून नित्य यज्ञ केल्याचे फळ मिळत राहते. तीर्थयात्रेला जायचे श्रम व त्यासाठी धनही खर्चावे लागत नाही.[२०] देवनिर्मित २१६०० श्वासोच्छ्वासांची जपमाळ अंतरीं जपली जात असल्याने मानवनिर्मित माळ लागत नाही.[२१] श्वासातच चालू असल्यामुळे अजपा जपास स्नानादी कर्मे देखील आड येत नाहीत.[२२]म्हणूनच, जीवशिवैक्य घडविणाऱ्या या भक्तीशिवाय बाकीच्या कठीण गोष्टीत तू व्यर्थ आपले मन घालू नकोस, असे श्रीज्ञानदेवांनी 'हरिपाठात' उपदेशिले आहे.[२३]

लाखो कोटी वेळा पशुपक्षी किडामुंगी म्हणून जन्मल्यानंतर भोगलेली प्रचंड दुःखे व कष्ट यांच्या तुलनेत स्वदेहातच असलेली ही देवकृत वाट चढून जाण्याचे कष्ट तुलनेत नगण्य होत. म्हणूनच 'एव्हवी या योगासारखे सोपे काय आहे', असे उद्गार श्रीज्ञानेश्वरांनी काढले आहेत.[२४] 'सदासर्वदा सन्निध'असलेल्या कृपाळू देवाला एकचित्ताने आळवणेरूपी अल्प धाडस[२५] करणाऱ्या सत्शिष्याला' याच देहीं याच डोळां मुक्तीचा सोहळा पहावयास' मिळतो व श्रीसद्गुरुनाथ हाताला धरून ब्रह्मांड-मंदिरात नेऊन आपल्या देवस्वरूपाची ओळख करून देतात.

संदर्भ व टिपा -

१. १) श्रीतुकाराम, अभंग : साच माझा देव्हारा....

२) श्रीज्ञानदेव, अभंग : संसारयात्रा भरली थोर....

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

३) पहा क्र. ५; २) श्रीतुकाराम, अभंग :वैकुंठा जावया ....
२. श्रीज्ञानदेव, हरिपाठ, अ. क्र. १ व २६ (स्वेद अंगीं कंप ..शोधणे)
३. श्रीकबीरदर्शन, १२.६७ व ५.११९
४. जीवनकलेचीसाधना, पृष्ठ क्र. ३५
५. श्रीज्ञानदेव, अभंग : दीप दीपिका शशी तारा..
६. श्रीज्ञानदेव, अभंग : नयनाचे शेजारी ....
७. श्रीनामदेव, अभंग : तुझे निजसुख तुजपाशी आहे..
८. ज्ञानयोग, पृष्ठ क्र. ३०९
९. आत्मप्रभा, पृष्ठे क्र. १३४-१३५
१०. श्रीकबीरदर्शन, ६.५१
११. श्रीशंकराचार्यकृत 'सदाचार', श्लोक. क्र. १०
१२. श्रीकबीरदर्शन, ६.२१-२४
१३. दासबोध, १७.१.१-१३
१४. विवेकचूडामणि,श्लोक क्र. १३
१५. श्रीतुकाराम, अभंग : हेचि थोर भक्ती..
१६. श्रीतुकाराम, हरिपाठ, अ.क्र. १७
१७; दासबोध, ८.९.५४
१८. श्रीतुकाराम, अभंग : ठायींच बैसोनी..
१९. ज्ञानेश्वरी, ९.५१८
२०. ज्ञानेश्वरी, ३.८९
२१. श्रीकबीरदर्शन, ६.७२-७४
२२. ज्ञानेश्वरी, १०.२३३
२३. हरिपाठ, अ. क्र. २
२४. ज्ञानेश्वरी, ६.३६३
२५. मनाचे श्लोक, क्र. ३६

-डॉ. विजय बाणकर

बी - ११०९, ग्रासलँड हाऊसिंग सोसायटी,
मु. कोल्हेवाडी, पो. खडकवासला (आर. एस.),
सिंहगड रोड, पुणे -४११०२४
(९३२५५८८०९५, ८६०५९९४३००)

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



माऊलींचे अमृतानुभव दर्शन २ : एकरुपता

शक्तिवाचून शिवाच्या ठिकाणी शिवपणा टिकत नाही. शक्ती, प्रकृती, अज्ञान, अविद्या, माया हे शिवसापेक्ष संज्ञारुप आहे. पुरुषाहून भिन्न असलेली शक्ती तिलाच प्रकृती म्हणतात. शास्त्रांमध्ये सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, स्वतंत्र, नित्यशुद्ध, बद्धमुक्त हे ईश्वराचे स्वभावधर्म आहेत. मायेने ते ब्रह्म झाकले जाते. मायेचे संसाररुपाने असणे हे ईश्वराचे केवळ लीलारुप.

- नामदेव सदावर्ते

आपल्या मातृभाषेचे सामर्थ्य सांगताना संतांच्या वाङ्मयीन रचनेतून प्रकट होते. संतांचे अभंग, नित्यपाठातील हरिपाठ, ज्ञानेश्वरी, भागवत आणि अमृतानुभवातून मराठी रचनेचे सामर्थ्य प्रत्ययास येते. प्रपंच, परमार्थ, अध्यात्म, योग या सर्वांविषयी संतांनी आपल्या अभंगातून जनसामान्यांना मार्गदर्शन केले आहे. यासाठी संतांच्या ग्रंथांचे वाचन, मनन, चिंतन करीत मराठी माणसांनी आपल्या जीवनात सुख, शांती, संपत्ती, आरोग्य प्राप्त करून घ्यावे. संतवाङ्मयाच्या श्रद्धापूर्वक अभ्यासाने मनास प्रसन्नता लाभते. गीताईच्या दुसऱ्या अध्यायात भगवंत सांगतात,

प्रसन्नतेपुढे सारी दुःखे जाती झडोनिया ।
प्रसन्नतेने बुद्धीची स्थिरता शीघ्र होतसे ।।२.६५।।

बुद्धीची स्थिरताच मनाची चंचलता नष्ट करुन मनःशाती प्राप्त होते. अमृतानुभवात ज्ञानराजांनी परमात्म्याचे अद्वितीय स्वरूप लक्षणे सांगताना अद्वैताचे दर्शन घडविले आहे. जगात सवत्र द्वैत स्पष्ट दिसत असले तरी, त्याच्या मुळाशी असलेले अद्वैत पाहणे यासच परमार्थ भक्ती वा अध्यात्म म्हणतात. जीव आणि शिव हे दोन भासत असून, ते अद्वैतरुप आहे. जीवाशिवाची एकरुपता म्हणजेच आनंद, परमानंद!

जगतरुपी संसारात प्रकृती व पुरुष सर्वत्र दोघेच दिसतात. पण, त्यांच्यात फक्त नामरुपाचा भेद आहे. प्रकृती व पुरुष हे आपले पारमार्थिक स्वरूप एक ब्रह्मचैतन्य. तेच ते प्रकट करतात. हा विचार ज्ञानराज अमृतानुभवात सांगतात-

दो दांडी एक श्रुती । दोहो फुली एक इति।
दोहों दिवी दीप्ती । एकीची जेवी ।।१.१८।।
दो ओठी एक गोष्टी। दो डोळा एक दृष्टी ।
तेवी दोघीं जिही सृष्टी । एकीचि जे ।।१.१९।।

दोन टिपऱ्या एकावर एक मारण्याने एक शब्द उत्पन्न होतो. फुले दोन असली तरी सुगंध एकच असतो. दोन दिवे असले तरी प्रकाश एकच असतो. दोन ओठ असले तरी एकच शब्द उच्चारला जातो. डोळे दोन असले तरी दिसणारी सृष्टी एकच असते. त्याप्रमाणे दोघा प्रकृती-पुरुषाच्या योगात हे सारे

जगत निर्माण झाले आहे.

पाण्याच्या अस्तित्वाने जशी लाट भासते, तशी पुरुषाच्या असण्याने प्रकृती प्रकाशते. प्रकृती ही पुरुषाच्या सत्तेने विश्व प्रकट करते. त्या प्रकृतीचे जगतरुपाने भासणे हेच पुरुषाचे अस्तित्व होय. अलंकार रुपाने जसे सगळे सोनेच असते, तसे प्रकृतीरुपाने पुरुषच सर्वत्र नटलेला असतो. दोघांची स्वरुपसत्ता एकरुपच असते.

गोडी आणि गुळु। कापूर आणि परिमळू ।
निवडूं जाता पांगुळु । निवाडु होय ।।१.२३।।

दिवा आणि प्रकाश वेगळा नसतो. गूळ आणि गोडी, कापूर आणि सुगंध एकरुपच असतात. दोघे एकमेकांच्या आश्रयाने एकरुप असूनही दोन भासतात. सूर्य पाहिल्यावर तेज, प्रकाश वेगळा पहावा लागत नाही. तसेच शक्ती नसेल तर शिव प्रकट होत नाही. शिवाच्याच आधाराने शक्ती विश्वरुपाने भासते.

शक्तिवाचून शिवाच्या ठिकाणी शिवपणा टिकत नाही. शक्ती, प्रकृती, अज्ञान, अविद्या, माया हे शिवसापेक्ष संज्ञारुप आहे. पुरुषाहून भिन्न असलेली शक्ती तिलाच प्रकृती म्हणतात. शास्त्रांमध्ये सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, स्वतंत्र, नित्यशुद्ध, बद्धमुक्त हे ईश्वराचे स्वभावधर्म आहेत. मायेने ते ब्रह्म झाकले जाते. मायेचे संसाररुपाने असणे हे ईश्वराचे केवळ लिलारुप.

पतिचेनि अरुपपणें । लाजोनि अंगाचे मिरवणें ।
केले जगाएवढे लेणे । नामरुपाचे ।।

प्रकृतीचा हा पुरुष अरुप आहे. त्याला हात, पाय, नाक, तोंड, डोळे, कान नाही. तो निरवयवी आहे. अशा पतीच्या अस्तित्वाने मायारुप प्रकृती लाजली. अशा अरुप, निराकार, निर्गुण पुरुषाला तिने आपल्या मायेने जगाएवढा दागिना केला. त्यामुळे त्या पुरुषाला नाम, रुप, गुण प्राप्त झाले. प्रकृतीनेच आपल्या पुरुषाला नाम, रुप, गुण देऊन सगुण साकार बनविले. प्रकृतीच्या इच्छेनुसार पुरुष साकार झाला. तो अनेक रुपाने सर्वत्र दिसू लागला. निर्गुण, निराकारी, निरअवयवी असा हा सच्चिदानंद ईश्वर मायेच्या रुपाने सर्वत्र नटला.

शिव-शक्ती हे शब्द दोन आहेत. पण त्याचा अर्थ एकच आहे. त्यासच परमात्मा, परब्रह्म म्हणतात. प्रकृती व पुरुष एकरुप असूनही प्रकतीने पुरुषाच्या मदतीने जगत निर्माण केल्यावर दोघे जगतात प्रकट होतात.

सांडुनि मीठपणाचा लोभु । मीठे सिंधुत्वाचा घेतला लाभु ।
तेवी अहं देऊनि मी शंभु । शांभवी झालो ।।१.६३।।

शिवशक्ती समावेशन ही नाममुद्रा असलेल्या प्रकरणात संत ज्ञानराज सांगतात. जसे मीठाने आपल्या घनत्वाचा व अल्पत्वाचा लोभ टाकून ते मीठ समुद्राशी समुद्ररुप झाले. त्याप्रमाणे एकदेशी, सगुण व द्वैतदेहाहंकार टाकून शिव-शक्ती एकरुप झाली. द्वैतबुद्धीचा त्याग करुन देवोदेवीस मी वंदन केले, असे ज्ञानराज सांगतात. स्वप्नासह निद्रा जाताक्षणीच निद्रित पुरुष आपल्या जागृत अवस्थेत

येतो. जसे आरशात पाहणारा एक आहे, पण त्या एकाचे दोन बिंब-प्रतिबिंब दारवविणारा आरसा तिसरा असतो. ही दृष्य, द्रष्टा, दर्शन ही त्रिपुटी दूर सारून आत्मस्वरुपात निमग्न होणे हेच शिवशक्तीचे, प्रकृती पुरुषाचे एकरुपत्व मानतात. शिव या शब्दात तीन अक्षरे आहेत. श, ई, व. त्यापैकी श म्हणजे शरीर, ई म्हणजे ईश्वर, व म्हणजे माया. माया, अविद्यारुप शरिरातील आत्मरुप ईश्वरशक्ती या शरिरातून बाहेर पडताच शिवातून शक्तीरुप ईश्वर बाहेर पडतो व पृथ्वीवर फक्त शव शिल्लक राहते. शिवशक्तीच्या एकरुपतेचा अध्यात्मिक विचार प्रथम प्रकरणात, तर अमृतानुभवाच्या दुसऱ्या प्रकरणात ज्ञानराज सद्गुरूंचे स्वरुप प्रकट करून सद्गुरूस्तवन करतात.

आतां उपायवनवसंतु । जो आज्ञेचा अहेवतंतु ।

अमुर्तचि परी मूर्तु । कारुण्याचा ।।२.१।।

सत्शिष्याचा नित्यमुक्त आत्मभाव माया, अविद्यारुप हत्तीने आच्छादित झाला होता. त्या अज्ञान, अंधश्रद्धा, माया, अविद्यारुप हत्तीस नित्यशुद्ध, मुक्त, आत्मभावरुपी ज्ञान-शस्त्राने नाहीसे करुन आत्मज्ञानरुपी मोती हेच जणू अन्न. त्याचे भोजन वाढून सत्शिष्यास अनुभवरुप मुरवाने जेवविणाऱ्या सद्गुरू निवृत्तीस मी वंदन करतो, असे ज्ञानराज सांगतात.

शिष्याचे अज्ञान दूर करण्यासाठी सद्गुरू तत्वमसि, अहं ब्रह्मास्मि, प्रज्ञानं ब्रह्म व अयंआत्माब्रह्म या चार महावाक्यांचा बोध केल्याबरोबर देहत्रयातीत, गुणत्रयातीत, सच्चिदानंदरुप, नित्य आत्मा मी आहे, असे ज्ञान अनुभवास येते व त्याचबरोबर अज्ञानावरणाची निवृत्ती होऊन आत्मसुखाचा लाभ सत्शिष्यास होतो.

आत्मस्वरुप झाकणारी अविद्या, माया कोणती आहे? तर मी देह आहे, मी जन्मास आलो व मी मरणार आहे. मी ब्राह्मणादि जातीचा, गोरा, काळा आदि देहधर्म आपल्या ठायी आहे, असे मानणारी वृत्ती. अशा अज्ञान अविद्याग्रस्त जीवाने सद्गुरूस शरण जावे.

उगमापासून मोठ्या लगबगीने खळाळत धावत जाणाऱ्या नदीची सागराशी गाठ पडल्याबरोबर तिच धाव बंद होऊन सागराशी समरस होऊन ती स्थिर होते. त्याप्रमाणे ब्रह्मरुप सद्गुरु हेच कोणी समुद्र व साधकाचा जीवात्मा हीच कोणी एक सरिता आहे. श्रवण, मनन, निदिध्यानरुपी उपायाच्या साधनाच्या ओघाने वाहत जाणाऱ्या जीवरुप नदीची ब्रह्मरुप सद्गुरूरुप समुद्राशी गाठ पडल्यावर साक्षात्कार होतो व सरिता क्रियाशून्य होऊन स्थिरावते.

शिव शिवा सद्गुरू । तुजला गूढा काय करू ।

एकाही निर्धारू धरूं । देतासी कां ।।२.३७।।

ज्ञानराज म्हणतात, सद्गुरुपाचे स्तवन करणे, नमन करणे, दर्शन घेणे हे मा याकडून घडत नाही. हे सद्गुरू गूढा, तुमचे स्वरुप नामातित, सूक्ष्मतम, निराकार असल्यामुळे स्थूल इंद्रियांना अथवा मनबुद्धीला ते रुप जाणता येत नाही. असे सर्वतोपरी गुप्त आहे. तु या स्वरुपाला तूच जाणतोस. सारे जगत आपल्या पोटामध्ये घालून सद्गुरू गगनाएवढे झाले आहेत. सागर नेहमी पूर्ण असतो. पाऊस पडला नाही तर नद्या, नाले, विहिरी, तळे आटून जातात. पण समुद्र संपूर्ण असतो. तसे सद्गुरू परिपूर्ण

असतात. ज्ञानाचे, आत्मविद्येचे सागर असतात.

पहा पा निरंजनी निदेला । तो निर्विवाद एकला ।

परी चेता चेवविता जाला । दोनी तोचि ।।२.६६।।

कोणी एक मनुष्य निर्जन अरण्यात एकटा झोपला होता. तो काही वेळानंतर जागा झाला, पण त्याला जागे करणारा व जागा होणारा दोन्ही तोच आहे. तसे शिष्यरुपाने सद्गुरूच असतात. म्हणजेच सच्चिदानंद सद्गुरू आपल्या शिष्यास तूच सच्चिदानंद स्वरुप, आत्मरुप आहेस असा अनुभव देतात. शिश्य व सद्गुरू यांच्यात अद्वैत निर्माण होण्यासाठी आत्मानुभूती रुप अमृताचा लाभ व्हावयास हवा. या गुरुशिष्य नात्याचे रहस्य इतकेच आहे की, जरी गुरू आणि शिष्य हा द्वैतभाव आहे, तरी सद्गुरूच्या परमार्थरुपी ऐक्यभाव आहे. गूळ आणि गोडी, कापूर आणि सुगंध जसा एकरुप आहे, तसे सद्गुरू व सत्शिष्य एकरुपच असतात.

ज्ञानराज म्हणतात-आता मी श्रीगुरूंना नमन केल्याने परा, पश्यंति, मध्यमा, वैरवरी या चारही वाचारुपी ऋणातून उत्तीर्ण झालो.

आतां ज्ञानदेवो म्हणे । श्रीगुरुप्रणामे येणें ।

फेडिली वाचा ऋणें । चौही वाचांची ।।२.८०।।


मी वाचाऋणातून कसे मुक्त झालो, सद्गुरूंना कसे वंदन केले, ते ज्ञानराज सविस्तरपणे सांगतात. अमृतानुभवाच्या तिसऱ्या प्रकरणात त्याचे वर्णन केले आहे. सद्गुरू ज्ञानराजांना वंदन!

- नामदेव सदावर्ते,

पसायदान बंगला, मानकर मळा,

मरवमलाबाद, नाशिक

***



गौळणी गायन : एक चिंतन

ज्ञान, वैराग्य, तप, योग, साधना यांना महत्त्व आहे, परंतु प्रेमाशिवाय ते कोरडे पडतात. प्रेमामुळेच भक्तीला जीवन प्राप्त होते. म्हणून संतांनी स्वतःला गोपिकांच्या भूमिकेत ठेवले आणि श्रीकृष्णाशी प्रेमसंवाद साधला. या अनुभूतीतून निर्माण झालेले काव्य म्हणजे गौळणी. त्या केवळ काव्य नसून अनुभूतीचे शब्दरूप आहेत. संतांनी जे अनुभवले, तेच त्यांनी शब्दबद्ध केले. त्यामुळे गौळणी समजण्यासाठी केवळ भाषेचा अर्थ समजून चालत नाही. त्यामागील प्रेमभक्ती समजणे आवश्यक असते.

- बंडोपंत दि. कुलकर्णी

परमार्थाच्या मार्गावर चालणारा मनुष्य परमेश्वराचे नामस्मरण, नामसंकीर्तन किंवा भजन जाणत नाही, असा शोधूनही सापडणार नाही. मानवाच्या आध्यात्मिक जीवनात भजनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. खरे पाहता परमेश्वराच्या स्मरणासाठी मोठ्या मंडळीची किंवा विशेष साधनांची आवश्यकता नसते. एकांतात, एकट्याने, अंतःकरणातील शुद्ध भावनेने घेतलेले भगवंताचे नावही तितकेच प्रभावी असते. अनेक संतांनी याची प्रचिती आपल्या जीवनातून दिली आहे.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे उदाहरण याबाबतीत विशेष उल्लेखनीय आहे. ते डोंगरावर जाऊन एकांतात भजन करीत बसत असत. संसाराच्या गजबजाटापासून दूर जाऊन ते विठ्ठलनामात इतके तल्लीन होत की त्यांना देहभान राहत नसे. त्यांच्या पत्नी जिजाई त्यांच्यासाठी अन्न घेऊन जात असत. लहानपणी आजी-आजोबांकडून आपण अशी कथा ऐकलेली आहे की एकदा जिजाईंच्या पायात काटा मोडला असता स्वतः पांडुरंग तेथे प्रकट झाला आणि त्यांच्या पायातील काटा काढून त्यांना साहाय्य केले. या कथा ऐतिहासिक दृष्ट्या तपासण्याचा विषय नसून, त्या भक्तीची गोडी वाढविणाऱ्या आणि भक्त-भगवंतातील नाते दृढ करणाऱ्या आहेत. त्यामधून एकच संदेश मिळतो की जिथे निष्कपट भक्ती असते, तिथे परमेश्वर स्वतः धावून येतो.

भजन ही केवळ संगीताची किंवा मनोरंजनाची गोष्ट नसून ती ईश्वरप्राप्तीची साधना आहे. जेव्हा अनेक भक्त एकत्र येतात, तेव्हा सामूहिक भजनाची निर्मिती होते. त्यावेळी तबला, पेटी, टाळ, मृदंग, वीणा, चिपळ्या यांसारखी वाद्ये उपयोगी पडतात. या वाद्यांचा उद्देश केवळ गाण्याला चाल देणे नसतो, तर भक्तांच्या मनाला एका लयीत आणणे हा असतो. अनेक मने जेव्हा एका नावात, एका भावात आणि एका स्मरणात एकरूप होतात, तेव्हा निर्माण होणारे आध्यात्मिक वातावरण विलक्षण असते. भारतातील विविध राज्यांमध्ये भजन परंपरा आहे. उत्तर भारतात, गुजरातमध्ये, राजस्थानात, बंगालमध्ये किंवा दक्षिण भारतात भजन म्हटले की भक्तिपर गीतांचे अखंड गायन होते. प्रारंभापासून शेवटपर्यंत भक्तीभावाचा एकच प्रवाह चालू असतो. परंतु महाराष्ट्राची संतपरंपरा विशेष आहे. येथे

भजनाला स्वतःची स्वतंत्र अशी सांप्रदायिक रचना प्राप्त झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील भजन केवळ गायन न राहता एक आध्यात्मिक प्रवास बनते.

सांप्रदायिक भजनाची सुरुवात वंदनाने होते. गुरू, देव, संत आणि श्रोते यांना नमस्कार करून भक्त आपल्या अहंकाराचे विसर्जन करतो. त्यानंतर नामघोष होतो. नामघोष म्हणजे सर्वांनी एकमुखाने घेतलेले भगवंताचे नाव. त्या नावामध्ये मनाची चंचलता कमी होऊन एकाग्रता वाढते. त्यानंतर पंचपदी, रूपाचे अभंग, ध्यानाचे अभंग, भजन आणि विविध संतवाणी यांचा क्रम येतो. पुढे गौळणी, संतपर अभंग आणि शेवटी आरतीने भजनाची सांगता होते. ही रचना अनेक शतकांच्या अनुभवातून विकसित झालेली आहे. भजनामध्ये नवविधा भक्तीतील अनेक प्रकार सहजपणे सामावलेले आहेत. श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन यांपैकी काही प्रकार स्पष्ट दिसतात, तर काही सूक्ष्म स्वरूपात असतात. एखादा भक्त भजन ऐकत असतो, तेव्हा तो श्रवणभक्ती करीत असतो. अभंग गातो तेव्हा कीर्तनभक्ती होते. भगवंताचे स्मरण करतो तेव्हा स्मरणभक्ती होते. शेवटी स्वतःचे अस्तित्व विसरून भगवंतात विलीन होण्याचा प्रयत्न करतो तेव्हा आत्मनिवेदनाची अनुभूती येते.

आध्यात्मिक मार्गात वैराग्य आणि ब्रह्मचर्य यांना महत्त्व दिले जाते. अनेकांना असे वाटते की संसार आणि परमार्थ हे परस्परविरोधी आहेत. परंतु संतपरंपरेचे निरीक्षण केल्यास तसे दिसत नाही. आपल्या बहुतेक संतांनी संसार केला. त्यांनी कुटुंब सांभाळले, व्यवसाय केला, शेती केली, समाजात राहिले आणि त्याच वेळी परमार्थही साधला. देवांनीसुद्धा संसार केला. श्रीराम, श्रीकृष्ण, भगवान शंकर या सर्वांनी गृहस्थाश्रम स्वीकारला. त्यामुळे संसार हा परमार्थाचा शत्रू आहे असे म्हणता येत नाही. समर्थ रामदास स्वामींनी स्वतः विवाह केला नाही, परंतु त्यांनी संसार करणाऱ्यांना कधीही संसार सोडण्याचा उपदेश केला नाही. उलट नेटका संसार करण्याचा उपदेश केला. संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात -

असोनी संसारी जिव्हे वेगू करी।
तेणे मुक्ती चारी साधियेल्या।।

या वचनात अत्यंत मोठे तत्त्वज्ञान दडलेले आहे. संसारात राहूनही जिभेवर भगवंताचे नाव असेल, तर मुक्ती प्राप्त होऊ शकते. यावरून स्पष्ट होते की संसार परमार्थाला बाधक नाही. मनुष्याच्या वासनात्मक प्रवृत्ती आणि आसक्ती बाधक आहेत.

अशा परिस्थितीत प्रश्न निर्माण होतो की संतांनी वैराग्याचा उपदेश करत असताना गौळणीसारखे प्रेमरसपूर्ण काव्य का लिहिले? आणि त्या भजनाच्या शेवटच्या टप्प्यात का गायल्या जातात? हा प्रश्न अनेकांना पडतो. कारण गौळणींमध्ये श्रीकृष्ण, गोपी, राधा, यमुना, वृंदावन, बासरी, प्रेम, विरह, मीलन यांचे वर्णन असते. वरवर पाहता हे सर्व सांसारिक प्रेमासारखे वाटते. परंतु संतांचा उद्देश वेगळा होता, हे संत साहित्यातूनच उलगडते.

आपण एखादी शौर्यकथा वाचत असतो तेव्हा नकळत स्वतःला त्या नायकाच्या जागी ठेवतो.

त्या कथेत आपणच लढत आहोत, आपणच विजय मिळवत आहोत, असे वाटते. त्याचप्रमाणे संतांनी गोपिकांच्या प्रेमभक्तीचा अनुभव घेताना स्वतःला गोपी समजले. ते स्वतःला स्त्री मानत नव्हते, परंतु भक्ताच्या भूमिकेतून भगवंताशी प्रेमसंबंध अनुभवत होते. नारदमुनींनी भक्तीचे वर्णन करताना गोपिकांच्या प्रेमाला सर्वोच्च स्थान दिले आहे. गोपिकांनी श्रीकृष्णावर केलेले प्रेम हे कोणत्याही स्वार्थापासून मुक्त होते. त्यांना श्रीकृष्णाकडून काहीच नको होते. त्यांना केवळ श्रीकृष्ण हवा होता. हे प्रेम इतके उत्कट होते की त्यामध्ये स्वतःचे अस्तित्वही लुप्त झाले होते. संतांना असे वाटू लागले की आपली भक्ती ज्ञानप्रधान आहे, वैराग्यप्रधान आहे, परंतु गोपिकांची भक्ती प्रेमप्रधान आहे. त्या प्रेमात एक प्रकारची माधुर्य आहे. म्हणूनच अनेक संतांनी भगवंताकडे विनवणी केली -

भक्ती प्रेमाविण ज्ञान नको देवा।

ज्ञान, वैराग्य, तप, योग, साधना यांना महत्त्व आहे, परंतु प्रेमाशिवाय ते कोरडे पडतात. प्रेमामुळेच भक्तीला जीवन प्राप्त होते. म्हणून संतांनी स्वतःला गोपिकांच्या भूमिकेत ठेवले आणि श्रीकृष्णाशी प्रेमसंवाद साधला. या अनुभूतीतून निर्माण झालेले काव्य म्हणजे गौळणी. त्या केवळ काव्य नसून अनुभूतीचे शब्दरूप आहेत. संतांनी जे अनुभवले, तेच त्यांनी शब्दबद्ध केले. त्यामुळे गौळणी समजण्यासाठी केवळ भाषेचा अर्थ समजून चालत नाही. त्यामागील प्रेमभक्ती समजणे आवश्यक असते.

मधुरा भक्ती हा भक्तीचा अत्यंत उच्च प्रकार मानला जातो. दास्यभक्तीत भक्त स्वतःला सेवक समजतो. सख्यभक्तीत मित्र समजतो. वात्सल्यभक्तीत आई-वडिलांसारखे प्रेम करतो. पण मधुरा भक्तीत भक्त स्वतःला प्रियकर किंवा प्रेयसीच्या भावनेतून भगवंताशी जोडतो. ही भावना अत्यंत सूक्ष्म आणि आध्यात्मिक आहे. तिचा संबंध देहाशी नसून आत्म्याशी आहे. गौळणी भजनाच्या शेवटच्या टप्प्यात का म्हणतात, याविषयी ठोस ऐतिहासिक पुरावा मिळत नाही. संतांनी याविषयी स्पष्ट विवेचन केलेले आढळत नाही. त्यामुळे आपण केवळ अनुमान मांडू शकतो.

भजनाच्या प्रारंभी मन स्थिर करण्याचे प्रयत्न होतात. नाम, ध्यान, अभंग यांद्वारे मन हळूहळू संसारातून वर उचलले जाते. पुढे भक्तीचा उत्कर्ष होत जातो. जेव्हा मन पूर्णपणे भगवंताकडे वळते, तेव्हा प्रेमभक्तीचा विषय म्हणून गौळणी येतात. त्यामुळे भक्ताला गोपिकांच्या प्रेमाची अनुभूती घेण्याची संधी मिळते. दुसरा विचार असा असू शकतो की भजन संपताना भक्ताला पुन्हा संसारात परतायचे असते. भजनात तो काही काळ देहभान विसरतो. परंतु जीवनातील कर्तव्ये टाकून देता येत नाहीत. म्हणून प्रेम, नाते, संबंध, व्यवहार यांची आठवण करून देणाऱ्या गौळणी शेवटी घेतल्या जात असाव्यात. त्यामुळे भक्त संसार सोडत नाही, पण संसारात राहून भगवंताचे स्मरण करतो.

संतांचा उद्देश कधीही संसारापासून पळ काढण्याचा नव्हता. उलट संसारात राहून भगवंताचे स्मरण करणे हा त्यांचा संदेश होता. म्हणूनच त्यांनी भक्ती आणि व्यवहार यांचा सुंदर समन्वय साधला. आजच्या काळातही या विचारांची गरज अधिक आहे. अनेक जण अध्यात्म म्हणजे संसारत्याग समजतात, तर काही जण संसारात इतके गुंततात की अध्यात्म विसरून जातात. संतमार्ग या दोन्ही

टोकांपासून दूर आहे. तो समतोलाचा मार्ग आहे. नामस्मरण, भजन, कीर्तन, सेवा, प्रेम आणि कर्तव्य यांचा सुंदर संगम म्हणजे संतांचा मार्ग. खरे पाहता कोणता अभंग कधी म्हणावा, कोणते गीत कोणत्या टप्प्यावर गायले जावे, यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे आपण त्यामध्ये किती समरस झालो. भगवंताच्या नावात मन किती विरघळले, भक्तीमध्ये किती प्रेम आले आणि जीवनात किती परिवर्तन झाले, हे अधिक महत्त्वाचे आहे.

वरील माहिती ही बुद्धीत साठलेल्या अनेक माहितींच्या आधारे केलेले चिंतन आहे. यातील मुख्य उद्देश वाद निर्माण करणे नसून भक्तीचे सौंदर्य समजून घेणे हा आहे. आपण सर्वांनी नामसंकीर्तनात समरस व्हावे, प्रेमभक्तीचा अनुभव घ्यावा, ईश्वरप्राप्तीकडे वाटचाल करावी आणि जीवन सार्थ करावे, हीच सदिच्छा. रामकृष्णहरी! सद्गुरू जंगलीदास माऊली चरणी समर्पित!


||आत्मा मालिक||

- बंडोपंत दि. कुलकर्णी,

सोलापूर

(जिल्हा न्यायाधीश, पुणे)

***



ऐसी कर्मगती ऐसा ध्यानी ज्ञानिया (भाग ७)

तेणे दशदिशा आत्माराम..

हरिपाठाचे सातत्य म्हणजे कळिकाळाचीही दृष्टी न पडण्याची ग्वाही. रामकृष्ण नामाचा प्रभाव अन् महिमा थोर आहे. या नामोच्चाराने पापाचे कळपही फिरकू शकत नाहीत, हरिमंत्र तर साक्षात शिवाचा जप. या उच्चाराचे सामर्थ्य तर मोक्षप्राप्ती देणारे अशी ख्याती. उत्तम स्थान, उत्तम गतीसाठी नारायण नामाची अगाध महती कथन केली गेली आहे.

-डॉ. सुनील शिंदे

सर्वकाळ हरीचिंतन हे अपार समाधान देणारे, आनंद बहाल करणारे आहे, असे सांगताना माउली संत ज्ञानदेव स्पष्ट करतात, परमानंदी मन नसणाऱ्या जीवाला ऋद्धि-सिद्धी या प्राप्त असल्या तरी, त्या निव्वळ उपाधी- बिरुदावलीच ठरतील! बुद्धी हे तर अनमोल वरदान आहे. बुद्धीने भगवंत आपलासा होऊ शकेल, हे सांगताना माउली पुढील दाखला देतात-

समाधि हरीची सम सुखवेंवीण।
न साधेल जाण द्वैतबुद्धि।।१।।
बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजें।
एक केशवराज सकळ सिद्धि।। २।।
ऋद्धि सिद्धि निधि अवघीच उपाधी।
जंव त्या परमानंदी मन नाहीं।।३।।
ज्ञानदेवीं रम्य रमलें समाधान।
हरीचे चिंतन सर्वकाळ।।४।।

(आशय : बुद्धीतील द्वैत लोपले की समाधीचे सम व शाश्वत सुख अनुभवता येते. त्यामुळे जीवाला बुद्धी हे सर्वात मोठे वरदान लाभले आहे आणि त्याच बुद्धीद्वारे तो केशीराज आपलासा करता येतो. ऋद्धी-सिद्धी मिळवणे म्हणजे उपाधी मिळवण्यासारखे आहे. जोपर्यंत त्या परमानंदात मन रमत नाही, तोपर्यंत त्याही काही कामाच्या उरत नाहीत. त्या हरिचे चिंतन मी सतत करीत असल्याने मला रम्य समाधान लाभले, असे माऊली सांगतात.)

हरिपाठाचे सातत्य म्हणजे कळिकाळाचीही दृष्टी न पडण्याची ग्वाही. रामकृष्ण नामाचा प्रभाव अन् महिमा थोर आहे. या नामोच्चाराने पापाचे कळपही फिरकू शकत नाहीत, हरिमंत्र तर साक्षात शिवाचा जप. या उच्चाराचे सामर्थ्य तर मोक्षप्राप्ती देणारे अशी ख्याती. उत्तम स्थान, उत्तम गतीसाठी नारायण नामाची अगाध महती कथन केली गेली आहे.

नित्य-सत्य मित हरिपाठ ज्यासी।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

कळिकाळ त्यासी न पाहें दृष्टी।।१।।

रामकृष्ण उच्चार अनंतराशी तप।

पापाचें कळप पळती पुढे।।२।।

हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा।

म्हणती जे वाचा तया मोक्ष।।३।।

ज्ञानदेवा पाठ नारायण नाम।

पाविजे उत्तम निज स्थान।।४।।

(आशय : जो सातत्याने आणि नित्यनेमाने हरिपाठ करतो, त्याच्यावर कळीकाळाची दृष्टी नाही पडत. रामकृष्णनामाचे कळपासारखे घनदाट उच्चार झाल्यास जीवाचे पाप त्याच्या पुढे पळत सुटते. हरिमंत्र जो शिवाप्रमाणे जपत असतो त्याला मोक्षप्राप्ती होते. नारायण नामाचा पाठ केल्यास उत्तम निजस्थान प्राप्त होते, अशी माउलींची स्पष्टोक्ती आहे.)

हरीनामाने द्वैत फिरकू शकत नाही. उरत नाही. अद्वैत शक्तीचा हा प्रभाव दखलपात्र म्हणावा लागेल. समबुद्धीने श्रीहरी नामाचे सामर्थ्य अगाध आहे. सर्वांघटी राम सामर्थ्य प्रतीत आहे. ते अलग नाही. हरिपाठाचा नेम बलशाली आहे. सातत्य प्रेरणादायी आहे.

एक नाम हरि द्वैतनाम दूरी।

अद्वैत कुसरी विरळा जाणे।।१।।

समबुद्धि घेतां समान श्रीहरी।

शमदमां वरी हरि झाला।।२।।

सर्वांघटी राम देहादेहीं एक।

सूर्य प्रकाशक सहस्ररश्मी।।३।।

ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा।

मागिलिया जन्मा मुक्त झालों।।४।।

(आशय : एकतत्त्व नामाचा मार्ग धरल्यास द्वैत उरत नाही आणि परमात्म्याचे अद्वैतरुप प्राप्त होते. समबुद्धीने हरिनाम घेतल्यास तो जीव शम-दम मनोनिग्रह-तितिक्षा ह्या गुणांना प्राप्त होतोच होतो. जसे पाण्याने भरलेले अनेक माठ ठेवल्यास त्यात सूर्यबिंब प्रत्येक माठात दिसेल, तसाच तो सर्व जींवामध्ये दिसतो. नित्यनेमाने हरिनामपाठ केला, तर मागील जन्माच्या पापपुण्यापासून मुक्त होतो, ही ज्ञानदेवांची धारणा आहे.)

खरेतर हरिनाम मुखी येणे ही बाबच मुळी भाग्याची. हरिनाम जपण्याची बुद्धी होणे अन् तसे ते नाम मुखी असणे तो जीव दुर्लभ. रामकृष्ण नाम तर किती सहज सुलभ. सहज वाचेने रामनाम अथवा रामकृष्ण उच्चारण होणे, यात जी उत्स्फूर्तता आहे, त्यास तोड नाही, तुलना नाही. हा सोपा भाव हृद्य आहे. रामकृष्ण नामाची तल्लीनता-तन्मयता-तद्रुपता सिद्धीप्रत घेऊन जाते. हरिपाठाची किमयाच अशी की सिद्धी-बुद्धी-धर्म दूर नाही. सहजसाध्य होय. रामकृष्ण नामाची मुद्रा विलक्षण प्रत्ययकारी. अगदी

दाही दिशा आत्मारामाची प्रचिती आनंददायी. यासंदर्भात माउली म्हणतात-

हरिबुद्धी जपे तो नर दुर्लभ।
वाचेसी सुलभ राम कृष्ण।।१।।
रामकृष्ण नामीं उन्मनी साधली।
तयासी लाधली सकळ सिद्धि।।२।।
सिद्धि बुद्धि धर्म हरिपाठीं आले।
प्रपंची निमाले साधुसंगे।।३।।
ज्ञानदेवीं नाम रामकृष्ण ठसा।
तण दशदिशा आत्माराम।।४।।

(आशय : वाचेला सुलभ असलेले रामकृष्णनाम जपल्यास ती बुद्धी असलेला जीव सर्व जिवात दुर्लभ ठरतो. ज्याने रामकृष्ण नामाने उन्मनी अवस्था साध्य केली, त्याच्या पुढे सर्व सिद्धी हात जोडून उभ्या असतात. सर्व प्रकारच्या सिद्धी हरिनामात असल्यामुळे हरीनाम जपणारा प्रपंचातून तरला जातो. ज्याच्यावर रामकृष्ण नामाचा ठसा पडला, त्याच्यासाठी दाहीदिशांत आत्माराम असेल, असे ज्ञानदेव सांगतात.)

नाम सामर्थ्याने साध्य होणारी ध्यानी प्रक्रिया विशुद्ध पारमार्थिक लाभ देणारी, आनंद देणारी. कर्मगती आणि ध्यानी स्थितीगती हे अद्वैत विलक्षणच म्हणावे लागेल.

- डॉ. सुनील शिंदे,
'तारांगण', महालक्ष्मी कॉलनी,
'दत्त सुकृत', व्हेलेन्सिया सोसायटी,
अकोले, जि. अहिल्यानगर

***



आत्मा मालिक गुरुपौर्णिमा महोत्सव-२०२६

आत्मा मालिक ध्यानपीठ, आत्मा मालिक ध्यानयोग मिशन, कोकमठाण येथे गुरूपौर्णिमा महोत्सव दि. २३ ते २९ जुलै २६ या कालावधीत प. प. सदगुरू माऊली, माता कनकेश्वरी देवी यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. या सोहळ्याला देशविदेशातून लाखो भाविकांनी हजेरी लावून सद्गुरूदर्शनाचा लाभ घेतला.

- बी.के. गायकवाड

आत्मा मालिक ध्यानपिठात या गुरुपौर्णिमा महोत्सवास दि. २३ जुलै रोजी पहाटे ब्रह्ममुहूर्तावर आत्मस्वरूप पाद्यपूजन, काकडआरतीने संतांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला. या महोत्सवातील दैनंदिन कार्यक्रमांतर्गत सप्ताहात ध्यानधारणा, भजन, सत्संग, हरिपाठ आणि प. पू. माता कनकेश्वरी देवी यांचा गुरूगीता वर्णन कथा ते निरूपण (दि. २३ ते २७ जुलै) पाच दिवस प. पू. सद्गुरू माऊली व आश्रमातील संत, भाविकांच्या उपस्थितीत पार पडला. आश्रमात गुरूपौर्णिमा महोत्सवासाठी प्रांगणात भव्य मंडप उभारण्यात आलेला होता. आश्रम परिसरातील मंदिर व अन्य इमारतींवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आलेली होती.

दि. २३ जुलै रोजी या उत्सवात प्रथम ज्यांनी ४० दिवस उपवास-अनुष्ठान केले होते, त्यांची अनुष्ठानपूर्तता करण्यात आली. सकाळी ६.३० ते ८ शांतीपाठ, हवन विधी झाला. सकाळी प. पू. माता कनकेश्वरी यांचे आश्रमात आगमन झाले. त्यांचे स्वागत संत परमानंद महाराज, संत निजानंद महाराज यांनी केले. त्यांच्या हस्ते आश्रमातील आत्मस्वरूप मंदिरासमोरील प्रांगणात ध्वजारोहन करण्यात आले. सकाळी ११ ते १२ आश्रमातील भजनी मंडळाकडून भजन सादर झाल्यावर ध्यान होऊन सकाळची आरती झाली व आलेल्या भाविकांनी प. पू. सद्गुरू माऊलींचे रांगेतून दर्शन घेतले. सायंकाळी ४ ते ५ दरम्यान नायगावकर भजनी मंडळाचा हरिपाठ झाला. दि. २४ रोजी सकाळी काकडआरती, ध्यान झाले. दहा वाजता इंदूरच्या प्रल्हाद सिंग टिपनीया यांच्या भजनांचा कार्यक्रम झाला व रांगेतून श्रीगुरुदर्शन झाले. शनिवारी दि. २५ रोजी आषाढ शुद्ध एकादशी. श्री क्षेत्र पंढरपूर यात्रा. पहाटे पाद्यपूजा, काकड आरती व मौन ध्यान झाले. सकाळी ७.२५ पासून प. पू. माऊलीचे दर्शन भाविकांनी कुटीत रांगेतून घेतले. दर्शनानंतर सर्वांना उपवासाच्या पदार्थांचा नाश्ता मिळाला. रोज सकाळी नाश्ता, चहा, दुपारचे व रात्रीचे प्रसाद भोजन याची अत्यंत चोख व्यवस्था करण्यात आली होती. आश्रमाचे विश्वस्त बाळासाहेब गोरडे, प्रकाश भट व प्रकाश गिरमे हे सर्व त्यासाठी परिश्रम घेत होते. आलेल्या सर्व भाविकांची प्रसाद भोजन व्यवस्था अखंडीत चालू होती.

सळाळी ९.३० वाजता इंदूरच्या गुरूमित सिंह यांनी आपली भजनसेवा गुरूचरणी सादर केली. त्यांनी प्रामुख्याने गुरूंचा महिमा वर्णन करणारी भजने सादर केली. त्यात 'गुरूबिन ग्यान न पावे साधू, तुम्ही मेरी बंदगी हो, तुमही मेरे आधार हो, तुम्ही मेरे आत्मा मालिक हो या भजनांचा समावेश होता.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

प. पू. गुरूदेवांचे सत्संग हॉलमध्ये आगमन होताच सर्वांनी आत्मा मालिक जयघोष केला. भजनांनंतर गुरूमित सिंह यांचा व त्यांचे सहकाऱ्यांचे आत्मा मालिक ध्यानपीठाच्या वतीने सदानंद महाराज व श्री. पवार यांनी आत्मस्वरूप प्रतिमा, शाल देऊन सत्कार केला. उपस्थित आमदार स्नेहलता कोल्हे यांचा सत्कार शांतीमाई व महादेवी माता यांच्या हस्ते करण्यात आला.

मनोगत व्यक्त करताना स्नेहलता कोल्हे यांनी, प. पू. सद्गुरूंचे या विश्वात्मक लोक कल्याणाचे असल्याचे सांगितले. येथील हजारो विद्यार्थ्यांना मिळणारे गुरूकुलातील चांगल्या प्रतीचे शिक्षण तसेच नियमित अन्नदान कार्यासंदर्भात धन्यवाद देवून कार्यास शुभेच्छा व आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. माता श्री कनकेश्वरी यांचा गुरूगीतावर्णन कथा सत्संग कार्यक्रम उत्तम सेवा उपक्रम असल्याचे त्या म्हणाल्या. सायंकाळी ५ वाजता हरिपाठ झाला.

दि. २६ रोजी सकाळी ७.३० वाजता भाविकांनी रांगेतून कुटीत श्रीगुरूदर्शन घेतले. सकाळी ध्यान-आरती नंतर ९ वाजता इंदूर येथील गोपाल शर्मा व त्यांच्या सहकाऱ्यांची भजनसेवा प्रारंभ झाली. शर्मा ही त्यांची भजनसेवा मागील २६ वर्षांपासून सद्गुरूचरणी अर्पण करतात. यावेळी शर्मा म्हणाले, श्रीगुरू ही सेवा करवून घेतात. गुरूंचे आशीर्वाद आहेत. गुरू साक्षात भगवान आहेत. संगीताचे सात सूर आहेत. या सात सुरांचा वाहता सागर गुरूदेवा तुझ्या नामासाठी आहे. कबिरांच्या दोह्यामधून ते सांगतात, जगातून चंद्र-सूर्य जातील, वाहते पाणी जाईल, परंतु आत्मा राहिल. कारण तो अमर आहे. आत्मा परमात्मा आहे. प. पू. सद्गुरूंचे सत्संगात आगमन झाले. आत्मा मालिक जयघोष झाला. गोपाळ शर्मा यांनी आत्मस्वरूप आरती म्हटली. भाविकांनी रांगेतून प. पू. सद्गुरूंचे दर्शन केले. संत परमानंद महाराज यांनी गोपाळ शर्मा यांचा आत्मा मालिक ध्यानपीठाच्या वतीने सत्कार केला.

सायंकाळी ५ वाजता सौ. सविता नायगांवकर भजनी मंडळाने हरिपाठ सादर केला. दि. २७ रोजी सायंकाळी ५.३० वाजता मनीषाबेन कात्रोडिया, सुरत यांची सुश्राव्य भजनसेवा सादर झाली. त्यांनी संत सुखराम, संत रविराम तसेच अन्य संतांची भजने गायिली. मनीषाबेन यांनी म्हटलेल्या भजनांतून अंतःकरणातील भजनवाणी प्रकटली. उपस्थित असलेल्या भाविकांतील अनेकांनी नाचून आनंद व्यक्त केला. या भक्तिमय संगीताने सत्संगहॉल चेतनामय झाला. योगेश्वर स्वामींचे आवडते भजन म्हटले. ८ वाजता श्री गुरुदेवांचे आगमन झाले. संत परमानंद महाराज यांनी मनिषाबेन व त्यांचे सहकाऱ्यांना संतप्रसाद दिला. कोपरगाव येथील पोलिस अधिकाऱ्यांचा सत्कार केला. आत्मा मालिक जयघोष व आरती झाली.

गुरूगीता वर्णन कथा

दि. २३ जुलै रोजी सायंकाळी ६ ते ९ वाजेदरम्यान प. पू. माता कनकेश्वरी यांचे सत्संग हॉलमध्ये आगमन झाले. गुरूगीता कथा श्रवणासाठी भाविकांची मोठ्या संख्येत उपस्थिती होती. संत परमानंद महाराज यांनी या गुरूपौर्णिमा महोत्सवासाठी उपस्थित सर्व भाविकांचे, मान्यवरांचे आत्मा मालिक ध्यानपीठाच्या वतीने हार्दिक स्वागत केले. प्रारंभी गुरूगीता ग्रंथाची उपस्थित संतांकरवी पूजा करण्यात आली. श्रीव्यासपूजा झाली. माता कनकेश्वरी देवी यांनी प. पू. सद्गुरूंचे स्मरण करून त्यांना वंदन केले. दूरदूर वरून आलेल्या भाविकांना वंदन केले. प्रथम दिनाची गुरूगीता कथा सांगण्यास प्रारंभ केला.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

प्रथम गीता अध्याय १२ मधील श्लोक पाठ झाला. त्यानंतर आपल्या मधूर वाणीतून गुरूस्तवन करतेसमयी त्या म्हणाल्या, 'आत्मस्वरूप, सूर्यस्वरूप, ज्योतीस्वरूप, ओंकारस्वरूप, जय गुरूदेव, दयास्वरूप, क्षमास्वरूप, भक्तिस्वरूप, शांतीस्वरूप, जय गुरूदेव.'

आत्मा मालिक माऊलींच्या प्रेरणेने आपले या आश्रमात गुरूपौर्णिमाच्या महाउत्सवास येणे होत आहे. हे परमभाग्य आहे. यापूर्वी आपण संत गगनगिरी महाराज यांच्यासोबत येऊन गेलो होते. त्याची आठवण त्यांनी करून दिली. हरे राम, हरे कृष्ण, हरे राम, हरे कृष्ण पद म्हणून गुरूगीता वर्णन कथेस आरंभ केला.

'गुरूर्ब्रह्मा, गुरुर्विष्णु, गुरूर्देवो महेश्वरः।।
गुरू साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरूवे नमः।।

गुरूंच्या सिद्धभूमीत येताच मनातील मोह, संशय, अनेक भ्रम याचे निरसन होऊ लागते. गुरू शिष्याच्या जीवावर प्रेम करतात. जीवाला स्वतंत्रता देतात. आपण स्वतंत्रतेऐवजी स्वच्छंदता घेतो. हे योग्य नाही. जीवाची स्वतंत्रता ही त्याचे स्वस्वरूप जाणण्यासाठी आहे. गुरू आपली अनुभूती शिष्यात पाहू इच्छितात. आत्मा सुख-दुःख देत नाही. आत्मा स्वयं सुख आहे. दुःख निर्माण होण्याचे कारण मानवाचे अज्ञान, वासना, कुसंग असते. आत्मा स्वंय आनंदस्वरूप आहे. श्रीगुरूस शरण गेल्यावर गुरू शिष्याला, जीवाला आत्मसन्मुख करतात व आत्मसुखाची प्राप्ती करवून देतात.

सत्संगात श्री. प. पू. गुरूदेवांचे आगमन झाले. आत्मा मालिक जय घोषात सर्वांनी गुरूदेवांचा जयजयकार केला. कथेच्या निरूपणानंतर आत्मदेव आरती झाली. भाविकांनी रांगेतून श्री गुरूदर्शन केले.

दि. २४ जुलै रोजी सायंकाळी हरिपाठानंतर ६ वाजता माता कनकेश्वरी देवी यांचे द्वितीय दिनाचे गुरूगीता वर्णन कथा प्रारंभ झाला. प्रथम भगवद्गीता अध्याय १२ वा भक्तियोग पाठ झाला. ग्रंथपूजा, व्यासपूजा झाली. ग्रंथपूजा जनार्दन स्वामी आश्रमाच्या वतीने करण्यात आली. गुरूस्तवन व हरे राम, हरे कृष्ण पदावली भजन झाले. भजन म्हटल्याने मन शुध्द होते. कनकेश्वरी देवी म्हणाल्या ' भक्तिसाठी गुरू कृपासिंधू आहेत. भक्ताने गुरूंना साक्षात परब्रह्म जाणावे. गुरू भक्तीसंदर्भात त्यांनी भक्त प्रल्हादाचे उदाहरण दिले. त्याचे वडील हिरण्यकश्यपू अहंकारी होते. श्रीविष्णूंनी नृसिंह अवतार घेऊन त्याचे निर्दालन केले. राम-रावण युद्धात रावणाचा अंत झाल्यावर श्रीराम म्हणतात 'मी नाही रावणाला मारले, त्याच्यातील अहंकाराने त्याला मारले. श्रीगुरू भक्ताला ज्ञान देतात. त्या ज्ञानाने शिष्याचे चित्तकमल विकसित होते. शिष्याने गुरूंचे गुरूतत्व स्विकारावे व त्यावर पूर्ण विश्वास करावा. अंतःकरणापासून गुरूचरणी शरण गेल्यावर शिष्याची साधना होऊ शकते. अन्यथा नाही. विशुद्ध आत्मज्ञान म्हणजे गुरूगीता आहे. गुरूगीता रामायण, महाभारत, भागवत सर्वत्र आहे.

श्रीगुरूंना रूपाने नाही तर स्वरूपाने जाणा. श्रीगुरू हे सिद्ध आहेत. ते शिष्याची मनशुद्धी करतात. श्रीगुरूंचे स्वरूप जाणण्यासाठी गुरूंचे, आत्मस्वरूपाचे आत्मचिंतन करा. आपली आत्मचेतना काही प्रसंगी अगदी साध्या साध्या प्रसंगात खंडण होते. उदा. राग, द्वेष इत्यादी विकार मनात येतात, त्यावेळी आपली, चेतनाशक्ती खंडित होते. त्यासाठी आपण गुरूंच्या ऊर्जाक्षेत्रात आले

पाहिजे. त्याने आपली चेतनाशक्ती प्रखर राहते. गुरू आज्ञेचे पालन करा. गुरू साधकाला जे काम सांगतात, त्यासाठी त्याला क्षमताही देतात. साधकाने आपले नाम, रूप गुरूचरणी विलीन करावे. त्यास गुरूकृपेने महत्त्व येते. जसे की, गंगा आपले सर्व ओघ समुद्रात विलीन करून समुद्रास मिळते. गुरू मन शुद्ध करतात. गुरूंना शरण गेल्याशिवाय ज्ञानप्राप्ती नाही. यानंतर प. पू. सदगुरूंच्या उपस्थितीत आत्मदेव आरती झाली.

दि. २५ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता माता कनकेश्वरी देवी यांच्या तिसऱ्या दिवशीच्या गुरूगीता कथेस आरंभ झाला. गीता भक्तियोग अध्याय १२ पाठ झाला. मान्यवरांच्या हस्ते ग्रंथपूजा झाली. ज्या मनुष्याच्या आत अहंकार आहे, तो मनुष्य क्रोध, लोभ आदि विकारांच्या अधीन होतो. आपल्या जन्म मृत्यूचे कारण वासनेत आहे. आपली कर्मे आपल्या जन्माचे कारण बनतात. श्रीगुरूचरणी शरण गेल्याने जन्मकर्मे निवारण होतात. मोह जीवनात दुःख आणतो व जीवाला बंधनात पाडतो. त्यातून मुक्त होण्यासाठी श्रीगुरूंचे पाठबळ पाहिजे. गुरू मोहापासून जीवाला सोडवतात. मोहाची समाप्ती गुरूकृपेने होते त्यासाठी श्रीगुरूंना अनन्य भावे शरण जावे. अज्ञानामुळे मनुष्याला मरणाचे भय वाटते. गुरूकृपेने अज्ञान दूर होऊन ज्ञान झाल्यावर हे मृत्यूभय राहत नाही. मनुष्य निर्भय होतो. यानंतर प. पू. सदगुरूंचे सत्संगात आगमन झाले. एकादशीनिमित्त सत्संग हॉल माता कनकेश्वरींच्या गोड वाणीतून श्री विठ्ठला विठ्ठला, पांडुरंग विठ्ठला पंढरपूरच्या विठ्ठल नाम संकिर्तनाने सत्संग हॉल टाळयांच्या गजरात दुमदुमला. सुंदर ते ध्यान उभे विटेवरी कर कटावर ठेवोनिया, श्री कनकेश्वरी माता पुढे म्हणाल्या, गुरूतप जगताला शीतलता देते. गुरूची सक्षमता शिष्याला सक्षम करते. श्रीगुरू ज्ञानमूर्ती आहेत. गुरू परमात्मा आहे. देवकृपेने मनुष्यजन्म मिळतो. श्री गुरूकृपेने जन्म-मृत्यूपासून जीवनमुक्ती मिळते. भगवान शंकर पार्वतीला सांगतात. श्रीगुरूंचे गुरूतत्व आणि परमात्म्याचे आत्मतत्त्व एकच आहे. सत्संगात बुद्धी आत्मबुद्धीच्या सन्मुख होते. श्रीगुरूंचे आत्म स्वरूपात ध्यान करा. आरती होऊन सायंकाळच्या सत्राची पूर्तता झाली.

दि. २६ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता माता कनकेश्वरी देवीजी यांचे गुरूगीता वर्णन कथा (चतुर्थ दिन) श्रीबुध कौशिक रचित श्रीरामरक्षा पाठाने सुरू झाली. मान्यवरांच्या हस्ते ग्रंथपूजेनंतर आश्रमात गुरूपौर्णिमा उत्सवासाठी आलेल्या उपस्थित मठापतींचा शाल देऊन सत्कार करण्यात आला. गुरूस्तवन झाले. हरे राम हरे कृष्ण पद म्हटले. शिष्याने गुरूंचे तत्त्व जाणावे. दशरथी राम आहे. आत्माराम आपल्यातच आहे. गायी जसे आपल्या वासराचे मलीन शरीर जीभेने चाटून स्वच्छ करतात, तसे श्रीगुरू शिष्याचे मलीन मन शुद्ध करतात. त्यासाठी श्रीगुरूचरणी शरण जावे. साधकाने जीवनात आपले लक्ष्य निश्चित करावे. ते जीवनात भोगमुक्त असावे. जीवनात जे प्राप्त आहे, त्यात समाधानी राहावे. श्री गुरूआज्ञेचे पालन करावे. त्याने शिष्याला सुख-शांती प्राप्त होते. श्रीगुरू परंपरेनुसार शिष्याला जीवनात संतुलीत बनण्यासाठी सेवा, संयम, साधना सेवाभावाने केल्याने अहंकार दूर होतो.

गुरू-शिष्याची स्थिती स्वतः सारखी करण्यासाठी कमी अवधी लागावा, म्हणून गुरू शिष्याचे मन आरशासारखे स्वच्छ करतात. ते गुरूंचे गुरूत्व आहे. ते शिष्याला प्राप्त होते. श्रीगुरूंचे चैतन्य विराट स्वरूपात आहे. श्रीराम श्रीकृष्ण गुणी असूनही त्यांनी आपले गुरूत ते गुण पाहिले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

प. पू. सदगुरूंचे आगमन झाले. माता कनकेश्वरी यांनी सांगितले, श्रीगुरूदेवांचे गुरूत्त्व असे आहे की, श्रीगणेशाचे गणेशतत्त्व जाणण्यासाठी श्रीगुरूंना शरण जावे. सेवा विनम भावे, संयम, साधना निष्ठेने करणाऱ्या श्रद्धावान शिष्याला श्रीगुरू आपल्याप्रमाणे बनवतात. त्यासाठी सत्संग अनिर्वाय आहे. संत परमानंद महाराज म्हणाले. प. पू. माता कनकेश्वरी देवी यांनी या गुरूपौर्णिमा महोत्सवास उपस्थित राहून गुरूगीता वर्णन कथा निरूपण केले. त्यांच्या मधुर वाणीतून सर्व आत्मा मालिक परिवारातील भाविकांना या गुरूगीता वर्णन कथा श्रवणाचा अलभ्य लाभ झाला आहे. यानंतर आरती झाली.

दि. २७ रोजी सकाळी ९ वाजता सकाळच्या सत्रात कनकेश्वरी देवी यांनी गुरूगीता वर्णन कथा सांगितली. त्या म्हणाल्या, 'आपल्या बहिर्मुख मनास अंतर्मुख करण्यासाठी श्रीगुरूकृपेची आवश्यकता आहे. त्यासाठी शिष्याने गुरूसंगत चालावे. श्रीगुरूकृपेने ज्ञान प्राप्त होते. शिष्याने ते कायम स्मरणी ठेवावे. गुरूपरंपरेतून मिळणारे ज्ञान व जाणकारी या दोन वेगळ्या बाबी आहेत. श्रीगुरूचरणी शरण येऊन मनास संबोधित करून गुरूभजनी राहावे. प्राप्त ज्ञान टिकते, जाणकारी निघून जाते. भक्ती अनेक प्रकारे असते, तथापि अनुभूती एक आहे.

चिदानंद रूपम् शिवोहम. श्रीगुरू शिष्याला जो साधनेचा मार्ग सांगतात, त्या मार्गाला साध्य करूनच घेतात. गुरूस्थान हे काशीस्थान आहे. गुरूचरण गंगातीर्थ आहे. गुरू साक्षात काशी विश्वेश्वर आहेत. गुरूकृपेने वेदांच्या ज्ञानासह वेदतत्त्व कळते. गुरू साक्षात परब्रह्मस्वरूप आहेत. गुरू आत्मज्ञानावर असलेल्या शास्त्राचा ज्ञानभार दूर करतात. गुरू शिष्याला आत्मविद्या, आत्मज्ञान प्राप्त करून देतात. सद्गुरू आत्मदर्शन करवून देतात. आश्रमात गुरूस्थानावर आल्यावर शिष्याने सेवाभाव ठेवून नियमांचे पालन करावे. शांती ठेवावी. श्री गुरूकृपेचा हा महिमा आहे. भगवान शंकर सांगतात शिष्याला खालील बंधनातून जावे लागते. संदेह, संयश, दया, भरवसा, संकोच, निंदा, अभिमान, धन, गुरूसेवा, प्रपंचभाव, गुरू स्थान. अशा शिष्याला श्रीगुरू आपल्यासम बनवितात. त्याचे माता-पिता, कुलदेवी धन्य होतात.

यानंतर संत परमानंद महाराज यांनी प. पू. कनकेश्वरी देवी यांना आत्मा मालिक ध्यानपीठ, ध्यानयोग मिशनतर्फे व प. पू. सद्गुरूंच्या इच्छेस मान देऊन पाच दिवस आश्रमात येवून श्रीगुरू कृपेने आपल्या ओघवत्या सुश्राव्य वाणीतून गुरूगीता वर्णन कथा निरूपण केल्याबद्दल धन्यवाद दिले. कनकेश्वरी देवी यांनी पुढील वर्षीही यावे, म्हणून निमंत्रित केले. यावेळी श्री. काबरा म्हणाले, श्री गुरूदेव आणि माता कनकेश्वरी देवी या दोन सूर्यांना विनम्र अभिवादन करतो. प. पू. माता कनकेश्वरी देवी यांचा आत्मा मालिक ध्यानपीठ ध्यानयोग मिशनतर्फे शांतीमाई आणि भारतमाता यांनी सद्गुरूंच्या वतीने सत्कार केला.

दि. २८ जुलै चौदसच्या दिवशी सकाळी नित्याप्रमाणे काकड आरती, ध्यान, भजनसेवा झाली. भाविकांनी चैतन्यकुटीत जाऊन रांगेतून सद्गुरूंचे दर्शन घेतले. सकाळी ९.३० वाजता कैलाश छाछुडा, भीलवाडा यांची भजनसेवा झाली. सकाळी ११.३० वाजता प. पू. सद्गुरुंचे सत्संग हॉलमध्ये आगमन झाले. कैलाश यांची भजनसेवा झाली. संत परमानंद महाराज यांनी सत्संगात भजन करणाऱ्यांचा सत्कार केला. उपस्थित मान्यवरांचा शाल व आत्मस्वरूप प्रतिमा देऊन सत्कार करण्यात

आला. माजी आमदार अशोक काळे यांना संतप्रसाद दिला. तद्नंतर आरती झाली. भजनसेवा सुरूच होती. भाविकांनी रांगेतून प. पू. सद्गुरूंचे दर्शन घेतले. सायंकाळी ठिक ५ वाजता नायगांवकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हरिपाठ सादर केला.

सायंकाळी दिंडी काढून नगरप्रदक्षिणा झाली. सायंकाळी ६.१५ वाजता जगदिश चव्हाण यांनी भजनसेवा दिली. त्यांना संत परमानंद महाराज यांनी धन्यवाद दिले. तद्नंतर इंदूर येथील गोपाळ शर्मा यांच्या भजनसेवेस सुरुवात झाली. यावेळी ते म्हणाले, मनुष्यदेह दुर्लभ आहे. तो मिळाला आहे, त्याचे कल्याण करून घ्या. आपल्य हृदयी आत्मा आहे. तोच परमात्मा आहे. त्या आत्म्याला जाणून घेणे हेच आपले जीवनाचे अंतिम ध्येय आहे. श्री गुरूकृपा जाणा. सर्व आत्म्यावर प्रेम करा हाच प. प. सद्गुरूंचा संदेश त्यांनी सर्व भाविकांना भजनातून दिला. संत मीराबाई, संत कबीर यांची भजने म्हटली.

विद्यमान आमदार श्री. कोल्हे यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी गुरूपौर्णिमा महोत्सव कार्यक्रमासाठी शुभेच्छा देऊन धन्यवाद दिले. ज्या भक्तांना नाम घ्यायचे होते, त्यांना रात्री प. पू. सदगुरूंनी नामदान दिले. रात्री १० वाजता येवला सत्संग मंडळाने आपली भजनसेवा श्रीगुरूचरणी सादर केली. या गुरूपौर्णिमा महोत्सवासाठी सर्व संत, ट्रस्टच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

मध्यरात्री १.१५ वाजता संत विवेकानंद महाराज यांनी प्रवचन केले. ते म्हणाले, सद्गुरू साक्षात परमात्मा आहे. आपला भाव तसा पाहिजे. सिद्धार्थ राजपुत्र सर्व संसार त्याग करून सत्य जाणण्यासाठी गेले. श्रीगुरूकृपेने अहंकार दूर होतो. सत्संगात व श्रीगुरू सानिध्यात मनुष्याने आपले चरित्र घडवून जीवाचे आत्मकल्याण करून घ्यावे.

दि. २९ जुलै रोजी पहाटे २.२० वाजता गोपाळ शर्मा यांचे भजन चालू होते. संतमंडळी प. पू. सदगुरूंच्या गुरूपूजनाच्या तयारीत होते. सर्वांठायी चैतन्य होते. पहाटेचे ३ वाजले. विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, आत्मा मालिक ध्यानपीठचा ध्यानयोग मिशन सत्संग हॉल आतून-बाहेरून भाविक-भक्तांच्या दाटीने भरला होता. सर्वांच्या अंतर्यामी आता श्रीगुरूचरणांच्या पूजेचे ध्यान लागले. सद्गुरू माऊलींचे ३.१५ वाजता चैतन्यमय वातावरणात, आत्मा मालिक जयघोषात पूजन झाले. श्री गुरूकृपा, त्यांची प्रेमळ दृष्टी सर्व उपस्थित भाविक अनुभवत होते. संत परमानंद महाराज यांनी या महोत्सवासाठी आलेल्या सर्वांचे, तन-मन-धन सेवा केलेले व अन्नदानासाठी सहाय्य दिलेल्या सर्वांचे आत्मा मालिक ध्यानपीठाच्या वतीने मनःपूर्वक आभार मानले व या महोत्सवाची सांगता झाली.

|| आत्मा मालिक ||

संकलन- बी. के. गायकवाड,

प्लॉट क्र. ५, नव महाराष्ट्र को. ऑप.हौसिंग सोसायटी,
पुणे-सातारा रोड, अरण्येश्वर कॉर्नर, पुणे-९.
(मो. नं. ९४०३०२६१६४)

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



आत्मा : आकार, मौन और वाणी के पीछे क़ा सत्य

शरीर बदलता है, उम्र बदलती है, विचार और संबंध भी बदलते हैं, फिर भी भीतर एक स्थिर मैं हूँ बना रहता है। यही आत्मा की पहली झलक है। मनुष्य की भूल संसार में जीना नहीं, बल्कि उसे अंतिम सत्य मान लेना है। आत्मा संसार से भागने की नहीं, उसे अर्थ देने वाली चेतना है। अतः यहीं से प्रश्न उठता है-यह चेतना संसार से कैसे जुड़ती है? इसका उत्तर इंद्रियों में मिलता है।

- नरेश यादव

सत् सत् पीछे कौन है, जाने कृष्ण औ राम।
वाणी मौन का सत्य है, निराकार में श्याम।।

मनुष्य स्वयं को शरीर, नाम और विचारों के रूप में पहचानता है। वह देखता है, सुनता है, सोचता है और इन्हीं अनुभवों को अपना जीवन मान लेता है। लेकिन यह केवल सतह है। इसके पीछे एक गहरी वास्तविकता है-आकार के पीछे निराकार, ध्वनि के पीछे मौन और वाणी के पीछे जो साक्षी है, वही आत्मा है। दृश्य संसार पूरा सत्य नहीं, बल्कि अदृश्य चेतना की अभिव्यक्ति है।

शरीर बदलता है, उम्र बदलती है, विचार और संबंध भी बदलते हैं, फिर भी भीतर एक स्थिर मैं हूँ बना रहता है। यही आत्मा की पहली झलक है। मनुष्य की भूल संसार में जीना नहीं, बल्कि उसे अंतिम सत्य मान लेना है। आत्मा संसार से भागने की नहीं, उसे अर्थ देने वाली चेतना है। अतः यहीं से प्रश्न उठता है-यह चेतना संसार से कैसे जुड़ती है? इसका उत्तर इंद्रियों में मिलता है।

इसलिय समझना आवश्यक है कि इंद्रियाँ : द्वार भी हैं और परीक्षा भी - पाँच इंद्रियाँ-नेत्र, कर्ण, नासिका, जिह्वा और त्वचा-संसार से संपर्क का माध्यम हैं। समस्या इंद्रियों में नहीं, उनके स्वामी बन जाने में है। जब वे आत्मा के अधीन होती हैं, तब वे बंधन नहीं, साधन बन जाती हैं।

आँखें रूप देखती हैं, पर आत्मा उन्हें रूप के पीछे की चेतना दिखाती है। कान शब्द सुनते हैं, पर आत्मा उन्हें शोर के बीच मौन सुनना सिखाती है। नासिका स्मृतियाँ जगाती है, पर आत्मा कहती है-आकर्षण आया, पर मैं आकर्षण नहीं हूँ। जिह्वा स्वाद और वाणी दोनों का द्वार है; आत्मा के प्रकाश में वही जिह्वा भोग नहीं, सत्य और करुणा का माध्यम बनती है। त्वचा स्पर्श देती है, पर आत्मा उसे स्वामित्व नहीं, संवेदना बनाती है।

यह दमन नहीं, परिष्कार है। मुक्ति जागरूकता से मिलती है, रोकने से नहीं। जब यह स्पष्ट होता है, तब इंद्रियों के पीछे कार्य करने वाली चेतना का बोध उभरता है-यही आत्मा का प्रभुत्व है।

आत्मा का प्रभुत्व शासन नहीं, प्रकाश है, आत्मा किसी राजा की तरह आदेश नहीं देती। उसका प्रभुत्व नियंत्रण का नहीं, प्रकाश का है। जैसे सूर्य किसी वृक्ष को हरा नहीं करता, फिर भी उसके बिना हरियाली संभव नहीं, वैसे ही आत्मा इंद्रियों को दबाती नहीं, उन्हें प्रकाशित करती है।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

वह बोलती नहीं, फिर भी सब कुछ उसी से घटित होता है। वह चलती नहीं, फिर भी जीवन उसमें चलता है। वह रूप नहीं, फिर भी सभी रूपों में झलकती है। इसलिए आत्मा को वस्तु की तरह नहीं देखा जा सकता। देखने वाली चेतना को देखने के लिए कोई दूसरा देखने वाला नहीं होता-यही आत्मा की ओर ले जाने वाला प्रश्न है। इस प्रश्न के साथ मनुष्य अपने अनुभवों को ही देखने लगता है।

मैं इंद्रियाँ नहीं हूँ, यही साधना के पहले परिवर्तन की पहचान है। जब हम कहते हैं-मैं देख रहा हूँ, मैं दुखी हूँ, मैं क्रोधित हूँ-तो हम अनुभव और अनुभवकर्ता को एक मान लेते हैं। लेकिन गहराई में स्पष्ट होता है कि देखना अलग है और देखने वाला अलग। दुख है, पर मैं दुख नहीं हूँ। विचार है, पर मैं विचार नहीं हूँ। क्रोध है, पर मैं क्रोध नहीं हूँ। यहीं से आत्म-ज्ञान शुरू होता है। यदि अनुभव देखा जा सकता है, तो देखने वाला अनुभव नहीं है। इस भेद से मनुष्य अपने भीतर परतों को पहचानने लगता है-शरीर, मन, बुद्धि, स्मृति, अहंकार-और इनके पीछे वह साक्षी जो सबको जानता है।इस साक्षी की पहचान के साथ मौन और वाणी का संबंध स्पष्ट होने लगता है।

मनुष्य बहुत बोलता है, पर शब्दों के आने के पहले या बीच जो स्थान है, वही मौन है, यह वही स्थान है जहाँ से शब्द आते हैं, शब्द नहीं भी आयें तो भी मौन विचारों का दमन नहीं, बल्कि उस चेतना की उपस्थिति है जो विचारों से पहले और बाद में भी रहती है।इसलिय सत्य यही है कि वाणी तभी शुद्ध होती है जब भीतर भाव, विचार और सत्य एक हों। जब भीतर और बाहर अलग हों, तो चेतना टूटती है। लेकिन जब शब्द सत्य और करुणा से निकलते हैं, तब वाणी केवल संवाद नहीं रहती-वह चेतना की अभिव्यक्ति बन जाती है। तब मौन जड़ है और वाणी उसका पुष्प।इस संतुलन के बाद मनुष्य शरीर और पहचान को नए दृष्टिकोण से देखने लगता है।

शरीर और आकार के पीछे के की वातविकता को समझें तो शरीर, नाम, पद, आयु-ये सब व्यवहारिक पहचानें हैं, अंतिम सत्य नहीं। शरीर आत्मा का घर है, आत्मा उसका आकार नहीं। शरीर की सेवा आवश्यक है, पर उसे देवता मान लेना भ्रम है। आत्मा शरीर के विरुद्ध नहीं, वह उसके माध्यम से प्रकट होती है। इसलिए देह का सम्मान जरूरी है, पर देहाभिमान अज्ञान है। इसके बाद साधक के सामने शक्ति और अहंकार का सूक्ष्म प्रश्न आता है, जो आत्मा और शक्ति के बीच का भ्रम को सही तरीके से समझने से हल होता है, क्योंकि आध्यात्मिक यात्रा में भी खतरा यह है कि यदि, साधक स्वयं को दूसरों से श्रेष्ठ मानने लगे, तो यह आध्यात्मिक अहंकार बन जाता है। मैं ज्ञानी हूँ, मैं जागरूक हूँ-यह सूक्ष्म रूप में लौट आता है।

सच्ची आत्मिक स्थिति में अहंकार पारदर्शी हो जाता है। शक्ति दूसरों पर नहीं, स्वयं पर शासन करती है। जो अपने लोभ, भय और क्रोध पर विजय पा लेता है, उसके भीतर गरिमा जन्म लेती है। शक्ति का मूल्य उसके उपयोग में है, न कि उसके स्वामित्व में। सिद्धियाँ हों तो वे सेवा के साधन हैं, संपत्ति नहीं। और जब शक्ति संतुलित होती है, तब वह जीवन में उतरती है। अतः आत्मा का जीवन में अवतरण बोध बहुत आवश्यक है, आत्मा की अनुभूति तभी पूर्ण है जब वह व्यवहार में दिखे। यदि ध्यान में शांति है, पर जीवन में अशांति है, तो साधना अधूरी है। यदि ज्ञान है, पर व्यवहार में शोषण है, तो वह

ज्ञान नहीं। आत्मा का प्रभुत्व हर स्थिति में दिखना चाहिए-घर, कार्य, संघर्ष, अकेलापन और मृत्यु तक। इसका प्रमाण चमत्कार नहीं, बल्कि पारदर्शिता है। मनुष्य अधिक सत्य, करुणा और विनम्रता की ओर बढ़ता है। अहंकार धीरे-धीरे घटता है। इस परिवर्तन के साथ भीतर और बाहर का भेद गहराई से बदलने लगता है।

अंतः आत्म साक्षात्कार से आकार में निराकार का बोध होता है आत्मा कहीं बाहर नहीं है। वह पहले से भीतर उपस्थित है। आवश्यकता केवल मन की शांति और दृष्टि की स्पष्टता है। जब मनुष्य आकार के पीछे निराकार को देखता है, मौन के पीछे चेतना को पहचानता है और वाणी के पीछे साक्षी को अनुभव करता है, तब जीवन बदल जाता है। तब आँखें देखती हैं, पर भीतर साक्षी रहता है। कान सुनते हैं, पर भीतर मौन रहता है। वाणी बोलती है, पर पीछे करुणा होती है। जीवन फिर केवल जीना नहीं रहता-वह चेतना का उत्सव बन जाता है।और यही उत्सव यात्रा का अंत नहीं, वास्तविक आरंभ है। आत्मा को जानना स्वयं को जीतना है। इंद्रियों को आत्मा में स्थापित करना मुक्ति है। मौन को समझना, वाणी को शुद्ध करना और आकार के पीछे निराकार को पहचानना-यही आध्यात्मिक जीवन है।

जब मनुष्य भीतर की प्रभु-सत्ता को स्वीकार करता है, तब वह दूसरों पर शासन की इच्छा छोड़ देता है और अस्तित्व के साथ समरस हो जाता है। तब शक्ति सेवा बनती है, सिद्धि साधन बनती है और जीवन एक मौन प्रार्थना।फिर यह जीवन इंद्रियों को आत्मा में स्थापित कर, मुक्ति अवस्था के समान चिर स्थायी होकर, आकार, मौन और वाणी के पीछे क़ा सत्य के साथ युगों युगों तक जीवंत आत्मा के रूप में गुरुत्व प्राप्त करता है और समस्त जगत के कल्याण निरंतरता से कार्य करता रहता है।-

||आत्मा मालिक||

निज निज कर ढिग बैठिये,

आत्म प्राण के साथ।

गुरु जीवन से लीजिये,


निराकार प्रसाद ||

- नरेश यादव,

आत्मा मालिक परिवार, इंदौर

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



आत्मा (SOUL)

।। हृदयामध्ये आत्म्यावरती प्रेम करण्याची कला म्हणजे ध्यान ।।

* प्रेषक *

संपादक, मासिक ॐ गुरुदेव

विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगांव रोड,

ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)-४२३६०१